श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक

वर्ष १२ अंक १-२ ] चैत्र वैशाख [ श. १८५७

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादक:—रामचंद्र आत्माराम तर्खड

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| साकोरीचा उपासनी ... ... ... | १-२ |
| श्रीसाईबाबांचें एक गुप्त लेकरूं ... ... | ३-१४ |
| अनुभव ... ... ... ... | १५-१९ |
| बाबा करजगांवांत, बाबा राजकोटांत ... ... | २०-२३ |
| श्रीसाईबाबा व सखाराममहाराज ... ... | २४-४८ |
| श्रीगुरुपौर्णिमेच्या उत्सवाचा जमाखर्च ... ... | ४९-५१ |
| गुरुपौर्णिमेच्या उत्सवासंबंधीं वर्गणीदारांच्या नांवांची यादी ... ... ... | ५२-५८ |
| शिर्डीवृत्त ... ... ... ... | ५९-६६ |
| अभंग ... ... ... ... ... | ६७ |
| श्रीगुरुपौर्णिमेचा उत्सव ... ... ... | ६८ |


# विनंति

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, ज्यांनीं वर्गणी अद्यापि पाठविली नाहीं, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी, अथवा V.P. करण्याचें सुचवावें.

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक--**श्रीसाईलीला**

५१ E. पार्ली रोड, खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार

**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान**

## कै. श्रीम्हाळसापति अंक

श्रीसाईसद्भक्तांच्या सोयीसाठीं कै. म्हाळसापति अंक वेगळा प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. किंमत ३ आणे. तरी जिज्ञासूंनीं त्याप्रमाणें मागणी करावी, ही विनंती.

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक--**श्रीसाईलीला कचेरी**

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमच्याकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड,**---प्रकाशक

# साकोरीचा उपासनी

रविवार ता. १४ एप्रिल सन, १९३५ च्या दिवशीं सायंकाळीं साकोरीचा उपासनी श्रीशिर्डी येथें येऊन श्रीसाईबाबांच्या पुण्य समाधि-मंदिराच्या आंत समाधीपुढील दक्षिणेकडील खांबाशीं टेकून बसला होता. त्या वेळीं कांहीं मंडळी सदरहू उपासनीच्या पायां पडत असतां श्रीसाई-

[illegible] ऑ. सेक्रेटरी श्री. सुंदरराव दिनानाथ नवलकर

## वर्गणीदारांस विनंती

श्रीसाईलीला मासिकाचें १२ वें वर्ष चैत्र शके १८५७ पासून सुरू झालें आहे. तरी वर्गणीदारांनीं वर्गणी भरण्याचें करावें. ज्यांच्याकडे गेल्या वर्षाची वर्गणी येणें अद्याप राहिली आहे, त्यांनीं ती त्वरित भरावी व पुढें अंक पाहिजे असल्यास त्याप्रमाणें कळवावें. चालू वर्षाची वर्गणी न आल्यास व्ही. पी. नें अंक रवाना करण्यांत येतील.

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. सेक्रेटरी,
शिर्डी संस्थान कमिटी

पर

२ वरील हकीकतीला अनुसरून "श्रीसाईबाबांचें शिर्डी संस्थान" ही संस्था निर्माण होऊन तिला सरकारकडून पुर्ण अनुमती मिळाली आहे.

३ सदरहू संस्थानचा साकोरी येथील उपासनीच्या मठाशीं कोणत्याही प्रकारचा काडीमात्र संबंध नाहीं, ही गोष्ट जगजाहीर आहे.

४ शिर्डी येथील श्रीसाईबाबांच्या शिरडी संस्थानचे श्री. सुंदरराव दिनानाथ नवलकर हे ऑ. सेक्रेटरी आहेत आणि त्यांच्या हुकमतीखालीं

असलेल्या सेवेकऱ्यांपैकी रा. बाळा शिंपी हा चोपदार या कामावर योजलेला आहे.

५ सदरहू बाळा शिंपी हा उपर निर्दिष्ट केलेल्या वेळीं वर दर्शविल्याप्रमाणें आपल्या चोपदारीच्या वेषांत सर्व सरंजामासहित होता आणि त्याचे सर्वोपरी श्री. सुंदरराव दि. नवलकर हे त्या पायां पडणारांचें त्यांच्या त्या केविलवाण्या कृत्याचा निषेध करीत होते.

६ हें सर्व ठाऊक व पाहत असूनही रा. बाळा शिंप्यानें, सेवेकरी या हुद्यावर असून, आपल्या कामगिरीची जबाबदारी बाजूला टेवून वरील प्रकारचे शब्दोच्चार व अमर्याद वर्तन आपल्या सर्वोपरी उपरी समोर केलें, ही गोष्ट अत्यंत गर्हणीय व लांछनास्पद झाली आहे. म्हणून शिर्डी संस्थानच्या कमिटीची पोटकमिटी ठराव करीत आहे कीं.—

**ठराव १:**—वरील हकीकत लक्षांत घेतां, बाळा शिंपी हा संस्थानच्या सेवेकराच्या नोकरीस नालायक आहे; परंतु त्यास यापुढें नोकरीवर ठेवणें किंवा न ठेवणें हें निश्चित करण्यापूर्वी त्याचा ह्या बाबतीत जबाब तावडतोब घ्यावा.

**ठराव २:**—वरील ठराव नं. १ ची नक्कल श्री. तात्या गणपत पाटील, संस्थानचे एक ट्रस्टी, शिरडी, यांजला व एक नक्कल रा. बाळा पिलाजी गुरव याजला पाठवून रा. बाळा पिलाजी गुरव यानें बाळा शिंपी याचा लेखी जबाब चोवीस तासांच्या आंत घेऊन ऑ. सेक्रेटरी श्री. सुंदरराव दि. नवलकर यांजकडे पाठवावा.

**ठराव ३:**—याउपरांत यापुढें कोणत्याही सेवेकऱ्यानें आणि संस्थानकमिटीशीं संबंध असलेल्या कोणाही इसमानें वरीलप्रमाणें प्रकार घडूं नये अशाविषयीं खास दक्षता ठेवावी हें शिरडी संस्थानकमिटीच्या मेंबरांचे आद्य कर्तव्य आहे याची जाणीव राखून ते कमिटीचे लायक मेंबर आहेत असें दाखवितील अशी कमिटी दृढ आशा करीत आहे.

श्रीसाईनाथप्रसन्न

# श्रीसाईबाबांचें एक गुप्त लेकरूं

रा. रा. साईलीला मासिककर्ते यांस सा. न. वि. वि.

खालील मजकूर आपल्या सर्वमान्य मासिकांत प्रसिद्ध कराल अशी आशा आहे. ही माहिती सर्व साईभक्तांस उद्‌बोधक व बोधप्रद वाटेल अशी खात्री वाटल्यावरून सदर माहिती पाठवीत आहें.

यंदा रामनवमीनिमित्त साईभक्त मुंबई, पुणें, खानदेश, वऱ्हाड, द. हैदराबाद संस्थान वगैरे लांबलांबच्या ठिकाणाहून आले होते. शनिवारचा दिवस होता. सकाळीं ९-९॥चा सुमार होता. दुकानदार आपआपल्या दुकानांची मांडणी करण्यांत गर्क होते. साईभक्त एकमेकांकडे जाऊन प्रेमानें एकमेकांस श्रीसद्‌गुरुंच्या कृपेचे अनुभव सांगत होते. कांहीं समाधिदर्शनास गेले होते. कांहीं उत्सवाच्या कार्यक्रमांत शक्त्यनुसार आनंदानें भाग घेत होते. अशा वेळीं कांहीं मंडळी शिरडींतील दीक्षितांच्या वाड्यासमोरील सगुणाच्या हॉटेलांत उपस्थित झाली होती. डाव्या बाजूकडील बांकावर लीलेचे संपादक बाबासाहेब व प्रोफेसर नरके बसले होते, व उजव्या बाजूला १०।१५ मंडळी बसली होती. त्यांत एक व्यक्ति गांवढळ अशी होती. ह्या व्यक्तीच्या डोकीस एक पांढरा मळकटसा रुमाल बांधलेला होता. अंगांत पांढरा हरिदासी अंगरखा होता. या व्यक्तीचें वय सुमारें ७० पर्यंत असावें. वर्ण गोर होता. दाढी पांढरी शुभ्र होती. डोळे बारिक, पण तेजस्वी होते. प्रोफेसरसाहेब व बाबासाहेब व इतर मंडळी श्रीसाईनाथांच्या महानुभावित्वाच्या गोष्टी सांगत होते व प्रोफेसरसाहेब त्यांच्या आवडत्या "सायन्सा"च्या गोष्टी सांगत होते व दिसणाऱ्या चमत्काराची "सायन्स"ची कसोटी लावून पाहावी असा त्यांच्या भाषणाचा कटाक्ष होता व त्यांनीं या वरील व्यक्तीची माहिती करून देईपर्यंत कोणाचेंही या खेडवळ व्यक्तीकडे लक्ष गेलें

नाहीं. ही व्यक्ति साईनाथांच्या कृपाप्रसादास पात्र झाली होती व त्यांनीं अध्यात्मिक सामर्थ्य प्राप्त करून घेतलें होतें वगैरे या व्यक्तीविषयीं प्रोफेसरसाहेब हकीकत सांगत असतांना व बाबासाहेब बोलत असतां "सायन्स" पलीकडील शक्तीशीं एकजीव झालेली ही व्यक्ति एक-दम उभी राहिली व "जयदत्तगुरु" "जयदत्तगुरु" असें म्हणत बाबासाहेब ज्या ठिकाणीं बसले होते, तेथपर्यंत जाऊन एक ओंजळ भरून बाबांची उदी त्यांनीं आपल्या ओंजळींतून काढून ती बाबासाहेबांच्या ओंज-ळींत सोडली व त्या व्यक्तीनें बाबासाहेबांस प्रेमानें आलिंगन दिलें. ती उदी सर्वांनीं थोडी थोडी घेतली. हा प्रकार पाहून तिथें असलेली मंडळी आश्चर्यचकित झाली !! त्याच दिवशीं समाधिजवळ रात्रीं सुमारें ९ वाजतां या व्यक्तीनें पुनः अशीच उदी काढली ती लेखकाला मिळाली, व त्याच्या जवळून तेथें हजर असलेल्या मंडळींनीं घेतली. हा उदी काढण्याचा प्रकार पाहून पुष्कळांच्या मनावर त्यांच्या सामर्थ्याचा चांगलाच परिणाम झाला अस-ल्याचें दिसलें. या व्यक्तीला हें सामर्थ्य कसें प्राप्त झालें व त्यांनीं साईनाथांचा कृपानुग्रह कसा संपादन केला याची माहिती मिळाल्यास पाहावें या हेतूनें ही व्यक्ति ज्या हॉलमध्यें उतरली होती, त्या ठिकाणीं लेखक व त्याचे मित्र गेले व त्यांची भेट घेऊन त्यांनीं हें सामर्थ्य कसें संपादन केलें व गुरुप्रसाद कसा प्राप्त करून घेतला,याविषयीं त्यांना स्वतःलाच विचारतां, त्यांनीं प्रेमानें सर्व हकीकत लेखकास सांगितली ती या लेखांत लीलेच्या वाचकांकरितां देत आहें. ह्यांत सुमारें ५० वर्षांपूर्वी साईनाथांचें प्रथम दर्शन झालें, त्या वेळीं साईबाबा जींत बसत, ती जुनाट मोडकळीस आलेली मशीद असे. तींत बाबा एकटेच बसत असत. त्यांच्या वस्तीच्या गांवालगत एक बाग होती. १७।१८ वर्षांचे ते असतांना त्यांची मराठी सातवी इयत्तेची परीक्षा पास झाली. त्या वेळच्या मानाप्रमाणें त्यांना दरमहा सात रुपये पगारावर मास्तरची नोकरी मिळाली असती. नोकरीच्या ऐहिक मोहांत न पडतां पार-मार्थिक सेवेंत रत होण्याची सुसंधि त्यांना एकाएकी प्राप्त झाली. नित्यनेमा-

प्रमाणे संध्याकाळीं एके दिवशीं बागेंत समवयस्क मित्रांबरोबर ते खेळण्यास गेले; खेळ झाल्यावर हे झाडावर चढले. बाकीचे सोबती आपआपल्या घरीं गेले. झाडावरून खालीं उतरल्यावर झाडाखालीं एक नग्न बोवा त्यांना दिसले. नग्न बोवा त्यांना म्हणाले, "बच्चा, मेरेकू एक शेर दूध लाव." व दुधाकरितां एक रुपया दिला. तो त्यांनीं घेतला व गांवांत जाऊन एका बाईला गाईचे दूध काढण्यास सांगितलें व एक शेराची किंमत दीड आणा देऊं केली. गावांत एक शेराची किंमत त्या वेळीं एक आणा होती. नग्न बोवाला दुधाला चार आणे पडले असें सांगून दहा पैसे आपल्याजवळ ठेवण्याची कुकल्पना या अल्पवयस्क तरुणास त्या वेळीं झाली व तें दूध घरीं नेऊन वडिलांस हा प्रकार न कळावा या हेतूनें शौचास जावयाचें आहे असा बहाणा करून तसें वडिलांस कळविलें. संध्याकाळ झाली होती, म्हणून त्या वेळीं खेडेगांवांत प्रचारांत असलेला कंदिल वडिलांनी तयार करून दिला. कंदिलास चारी बाजूंनीं कांच होती, मध्यें एक लहान टिनचें डबरें होतें; त्यांत राकेल घातलें होतें व डबड्यास चिंधीची वात होती. कंदिल घेऊन हातांत दुधाचा तांब्या घेऊन स्वारी निघाली ती थेट बागेंत नग्न बोवाकडे गेली व त्यास दूध दिलें व दुधास चार आणे पडले असें सांगून बारा आणे परत दिले. नंगेबोवांनीं तेही बारा आणे त्यांस बक्षिस दिले. युवक म्हणाला, "आतां रात्र पडत चालली आहे; मला गांवापर्यंत सोबत चला." इतक्यांत दिव्यांतील तेल संपल्यानें दिवा विझला. काडी लावून पाहिलं, तरी दिवा लागेना. दिवा लागत नाहीं असें बोवास सांगितलें. बोवा म्हणाले, "कांडी लगाव." काडी ओढल्यावर टिनचें डबडें राकेलनें भरल्याचें त्यास आढळून आलें व दिवा लागला! तेव्हां राकेल संपल्यावर पुन्हा राकेल कोठून आलें व दिवाही लागला. हा बोवा कोणीतरी विशेष सामर्थ्यवान साधु आहे अशा विचारतरंगांनीं त्याच्या डोक्यांत एकच काहूर माजून राहिलें. बोवा त्यास पोंचविण्यास आला. त्या लहान युवकास त्या रात्रीं झोंप आली नाहीं. वरील विचारांनीं त्याचें मन गुंग होऊन गेलें. दुसऱ्या दिवशीं उजाडतें केव्हां

व बोवांच्या दर्शनास आपण जातों केव्हां, असें त्यास झालें. उजाडल्यावर बोवांच्या दर्शनास गेला. हे नग्न बोवा १२०० नमस्कार रोज घालीत असत. त्यांना योगविद्या साध्य होती. त्यांना सिद्धि प्राप्त झाल्या होत्या. ते जारण-मारण जाणत असत. पण जारणमारण विद्येचा उपयोग परोपकारार्थ करीत असत. बोवा तीर्थयात्रा करीत. बोवांचें सामर्थ्य पाहून युवकानें त्यांचें शिष्यत्व पत्करिलें. त्यांनीं त्याला आपल्याबरोबर तीर्थयात्रेस नेलें. त्यांच्या बरोबर चारही धाम झाले. त्यांच्यामुळें त्यांना कांहीं सिद्धि प्राप्त झाल्या. प्रसंगानुसार या सिद्धीचा उपयोग त्यांच्याकडून होत असे. कांहीं वर्षें या गुरूच्या सहवासांत गेल्यावर गुरूनें त्यांना सांगितलें की, मी आतां गंगोत्रीच्या यात्रेस जाणार आहें व तुझी व माझी पुनः भेट होणार नाही. भावि कल्याणाकरितां तूं शिरडी येथील माझ्या बंधूकडे जा. गुरु गंगोत्रीच्या यात्रेस गेले व गुरूच्या आज्ञेप्रमाणें ते शिरडीस गेले. बाबा मशिदींत होते. त्यांना पाहतांच बाबा म्हणाले " मेरे भाईनें तेरेकू भेज दिया है ? अच्छा, रहो, " नंतर ते बाबांची सेवा करीत शिरडींत राहिले. श्रीसाईनाथांनीं त्यांना शिरडींत भिक्षा मागून राहण्यास सांगितलें होतें. त्याप्रमाणें भिक्षा मागून ते बाबांच्या सहवासांत राहत असत व मनापासून बाबांची सेवा करीत असत. मशिदींत फारसें कोणी येत नसे. बाबा त्यांना वाणी, मारवाडी यांजकडून कोढथा आणण्यास सांगत व त्यांच्याबरोबर " एकीबेकी"चा खेळ खेळत असत. एके दिवशीं श्रीसाई-बाबांनीं त्यांना तीन तोंडाच्या माणसाकडे जाऊन श्रीगुरुचरित्राचीं १०८ पारायणें करण्यास सांगितलें. तीन तोंडाचा मागूस या संदिग्ध शब्दाचा अर्थ श्रीदत्तात्रेय असें ते समजले व आज्ञेप्रमाणें गाणगापूरला जाऊन गुरु-चरित्राचीं १०८ पारायणें करण्याचें त्यांनी ठरविलें. श्रीबाबा नेहमी संदिग्ध भाषा वापरीत असत. तीन तोंडाच्या माणून याचा अर्थ दत्तात्रेय असा त्यांनीं आपल्या समजुतीप्रमाणें केला व तोच बरोबर होता असें त्यास पुढें अनुभवानें समजलें. ते गाणगापूर क्षेत्रीं गेले व रोज संगमावर स्नान

करून गुरुचरित्राचें पारायण करीत असत. संगमावर जातांना बरोबर खजूर नेत असत व पारायण झाल्यावर खजूर सेवन करून, संगमाच्या तीर्थांत चिंध्या भिजवून त्या पायांस बांधीत व गांवांत येऊन मधुकरी मागत असत. पायांस पाण्यांत भिजलेल्या चिंध्या बांधल्या असल्यानें कडक उन्हाच्या तापापासून थोडेंतरी निवारण होत असे एके दिवशीं चोविसाव्या पारायणाच्या दिवशीं ते खजूर नेण्यास विसरले. पारायण चालू असतां एक फकीर त्यांच्याजवळ आला व " हमकू भूक लगी है, खानेकू देव. " असें म्हणाला. त्यास देण्यास खजूर आपल्यापाशीं आहे कीं काय, म्हणून ते आजबाजूला पाहूं लागले. रोजच्याप्रमाणें खजूर आणला आहे अशी त्यांची कल्पना होती. पण आजूबाजूला पाहतां खजूर आणण्यास विसरल्याचें त्यांच्या ध्यानांत आलें. पोथी वाचीत असतानांच त्यांनीं फकिरास नमस्कार केला व त्या योगें त्यांस असें दर्शविलें कीं, मी आज खजूर आणण्यास विसरलों, खजूर असता तर दिला असता, कांहीं एक देतां येत नाहीं याबद्दल माफी व्हावी. तो फकीर निघून गेला. १०८ पारायणें पुरीं झाल्यावर ते शिरडीस श्रीबाबांकडे आले. येतांच मी तुझ्याकडे आलों होतों व तूं मला उपाशी ठेवलेंस, असें बाबा उद्गारले. तेव्हां बाबा फकिराच्या वेषानें येऊन आपल्यास कांहीं खाण्यास दे, भूक लागली आहे असें म्हणाल्याचें व आपल्याजवळ त्या दिवशीं खजूर नव्हता व फकिरास कांही देतां आलें नाही, या गोष्टीची त्यांना आठवण झाली व त्यांना बाबांच्या सर्वत्र अस्तित्वाची खूण पटली. नंतर श्रीबाबांनीं त्यास घरीं जाऊन जोडीदारास घेऊन येण्यास सांगितलें. जोडीदार याचा अर्थ आपले वृद्ध वडिल असें ते समजले. आज्ञेप्रमाणें आपल्या गावीं जाऊन आपल्या वडिलांस श्रींच्या दर्शनास शिरडीस आणलें. वडिलांस पाहतांच बाबा म्हणाले, " हा जोडीदार नव्हे. जोडीदार म्हणजे, तुझ्या पायांत विडा पडली आहे ना ? तिला घेऊन ये." श्रींनीं त्यांच्या वडिलांस आशीर्वाद देऊन त्यांची रवानगी केली. नंतर ते घरीं गेले व आपल्या कुटुंबास समर्थांच्या दर्शनास घेऊन आले. उभयतांना

पाहून आतां जोडीदार याचा अर्थ त्यांना बरोबर समजला असें श्रींनीं आपल्या कृतीनें व्यक्त केलें. उभयतांच्या अंगावर श्रीबाबांनी प्रेमानें हात फिरविला. दोघांस उदीचा प्रसाद देऊन उत्तम आशीर्वाद दिला व सिद्धि, मंत्रतंत्र यांच्यामागें न लागण्याविषयीं कळकळीनें बजाविलें व तूं **स्मरण करशील तेव्हां तुझ्याजवळ मी आहें, असें श्रींनीं त्यांना आश्वासन दिलें.** तेव्हांपासून श्रींचें स्मरण केल्यावर त्यांच्या ओंजळींत श्रीसाईबाबांचा उदी निर्माण होते. हा उदीचा अपूर्व चमत्कार यंदाच्या रामनवमीच्या उत्सवांत पुष्कळांनीं पाहिला आहे. बाबांच्या सांगण्याप्रमाणें त्यांनीं सिद्धि, मंत्रतंत्र यांचा मार्ग अजिबात सोडून दिला. त्यांनीं आपल्या गांवीं बाबांच्या नांवानें आश्रम स्थापन केला आहे. तेथें श्रीसाईनाथांच्या फोटोचें पूजनअर्चन चाललें असतें. त्यांची राहणी साधी आहे. आपल्या आश्रमांत ते बाबांचें भजनपूजन वगैरे करितात. रोगग्रस्त व इतर प्रापंचिक माणसें त्यांच्या आश्रमांत येऊन त्यांच्या आशीर्वादाचा व श्रीबाबांच्या उदीचा उपयोग करून घेतात व त्यांच्या इच्छितार्थ सफल होतात, असें त्यांच्या बरोबर आलेली मंडळी सांगत होती. ते शिरडीस वर्षां-दोन वर्षांनीं येतात. ते कुटुंबवत्सल आहेत. प्रपंच साधून परमार्थांत श्रीसाईनाथांच्या कृपेनें त्यांनीं बरीच प्रगति केली आहे. परमार्थ इच्छिणाऱ्या साधकास या वरील चरित्रापासून असा बोध घेण्यासारखा आहे कीं, श्रीसाई-नाथांस कोणत्याही दैवतांचें अनुष्ठान अगर कांहीं सतत कर्म आचरणें संमत होतें. कर्माच्या आचरणानें चित्तशुद्धि होते. नंतर ज्ञान व भक्ति यांचा मार्ग मोकळा होतो. जसजशी साधकाची प्रगति होत जाईल, तसतशी त्याची पारमार्थिक शक्ति वाढत जाते. त्यास सिद्धीही प्राप्त होते. सिद्धिची अवस्था प्राप्त झाल्यावर साधक चमत्कारांचें प्रदर्शन करण्याच्या मोहास बळी पडतो. त्यामुळें त्याचें सामर्थ्य वृद्धिंगत न होतां कमी कमी होत जातें; म्हणून साईनाथांनीं सिद्धि, मंत्र-तंत्र यांचा इन्कार केला आहे. साईनाथांनीं उदीला महत्त्व दिलें आहे. उदीचा महिमा श्रीसाईसच्चरित्रांत उत्तम तऱ्हेनें वर्णन

केला आहे. तो भाग साईभक्तांनीं अवश्य वाचावा. साईनाथांचे महानुभावित सर्वव्यापित्व व सर्वसाक्षित्व या चरित्रावरून स्पष्ट दिसून येतें.

आ.

श्रीसाईनाथ चरणरजःकण

वरील हकीकत प्रसिद्ध करण्यांत अत्यंत हर्ष वाटत आहे. ही हकीकत श्री. सगुण यांच्या दालनांत जी मंडळी बसली होती त्यांनीं पाहिली. त्यांपैकीं एका विद्वान् गृहस्थानें त्यानंतर त्या गृहस्थाकडे जाऊन जी माहिती त्यांच्या तोंडून ऐकली, ती लेखकाकडे त्याच्या विनंतीस मान देऊन श्रीसाईलीलेच्या वाचकांसाठीं पाठविली आहे.

त्या माहितींत सदरील श्रीसाईमाउलीच्या लेकरांचें नांव व राहण्याचें ठिकाण लिहिलें आहे. परंतु अशा रत्नाचें नांव–गांव छापल्यास त्याच्या मागें उपव्यापि मंडळीचा गराडा पडून त्यांना विनाकारण त्रास होऊं नये, याच हेतूनें त्यांचें नांव-गांव देण्याचें लेखकाला योग्य वाटत नाहीं. मात्र ज्या वेळीं श्री.सगुण यांच्या घरीं हा प्रकार घडला, त्या वेळीं जे गृहस्थ तेथें हजर होते, व ज्यांनीं हा प्रकार पाहिला, त्यांच्यापैकीं कोणाहीपाशीं केवळ जिज्ञासु भावनेनें कोणीही पृच्छा केल्यास या अद्वितीय रत्नाचें नांव-गांव, ते आनंदानें देतील.

आतां अपरिचित वाचक म्हणेल, "अहो, त्यांत काय ! हा केवळ गारुड्याचा खेळ." गारुडी खरा ! पण तो ब्रह्मांड खेळवणाऱ्या श्रीसाईमाउलीचाच त्यांच्या द्वारें खेळ !

त्या दिवशीं सकाळीं त्या वेळीं लेखक श्री सगुण यांच्या घरीं चहापानासाठीं एका बांकावर बसला होता. त्याच्या डाव्या बाजूस प्रो. नरके व त्यांचा मुलगा आणि उजव्या बाजूस श्री. रासने या नांवाचे नगरचे गृहस्थ बसले होते. समोर सतरंजीवर ठाण्याचे वकील श्री. गोपाळ भास्कर दातार

व सदरील श्रीसाईबाबांचें लेंकरूं,वांद्र्याचे श्री.कर्णिक व इतर सद्गृहस्थ बसले होते आडव्या बांकावर ठाण्याचे श्री. श्रीधर नारायण खारकर बसले होते.

श्रीसाईमाउलीच्या समाधीच्या अति उंच चबुतऱ्याच्या पश्चिमेच्या बाजूंस दोन ठिकाणांहून पाणी झिरपत असलेलें आहे. त्याविषयीं प्रो. नरके व लेखक यांचें साधकबाधक Scientific पाश्चात्य शास्त्रानुसारें संभाषण चाललं होतें. प्रो.साहेबांचा भूगर्भशास्त्राचा खास विषय व लेखक त्याच विषयांत B. Sc च्या परीक्षेंत उत्तीर्ण झाला असल्यामुळें उभयतांत बरींच प्रश्नोत्तरें झाली. मजल Capillary action म्हणजे अत्यंत सूक्ष्म असें कोठें तरी रंध्र असलें पाहिजे व त्यामुळें जमिनींतून पाणी वर चढत असावें असें प्रो. साहेबांचें मत. जवळ चार फुटांवर समाधिमंदिरांत भुयार आहे, तें सध्या कोरडें ठणठणीत आहे, आणि पश्चिमेच्या बाजूस सातआठ फुटां-वर विहीर आहे, तिच्यांतील पाणी श्रीच्या समाधीच्या त्या अत्युच्च जागे-पासून लगबग वीस फूट खोल असल्यामुळें सदरहू Capillary action नें आपलें समाधान होत नाहीं, असें लेखकाचें मत. आणखी तपास करून व पावसाळ्यांत काय प्रकार होतो वगैरे सर्व प्रकारची पूर्ण माहिती बारकाईनें मिळवून काय प्रकार आहे याविषयीं पाश्चात्य शास्त्रद्वारें विचार करून नंतर त्याविषयीं मत बांधावें; त्यांतही श्रीसाईमाउलीला कांहीं अशा प्रकारची कृति दाखवावयाची असल्यास ती अशक्य कोटींतील गोष्ट नाहीं; असें असूनही तपास चालू ठेवून विनाकारण सध्याच बभ्रा करून सामान्य जनतेची आपल्या हातून दिशाभूल न व्हावी यानिषयीं दक्षता ठेवावी, असें लेखकाचें मत.

अशा प्रकारच्या गोष्टी चालत असतां " काय हो, आम्ही श्रीसाई-माउलीच्या पायांपाशीं बसून कोरडे ठणठणीत राहिलों ! काय करावें !" असें खेदयुक्त वाक्य लेखकाच्या तोंडांतून निघतां क्षणींच, ज्या व्यक्तीविषयीं हा लेख लिहिण्यांत येत आहे व जी व्यक्ति इतका वेळपर्यंत स्वस्थ बसली

होती, ती तात्काळ उठून लेखकाकडे धांवत आली. "अरे! असें काय बोल-तोस! बाबा काय दूर आहेत? जयदत्तगुरु जयदत्तगुरु! दत्त! दत्त! हात पसर!"

त्याप्रमाणें लेखकानें ओंजळी पसरली. तर काय आश्चर्याची गोष्ट! "जयदत्तगुरु! जयदत्तगुरु" असें असें मुखानें सारखें बोलत. शरीर सद्गुरु-प्रेमानें थरथरत, दोन्ही हात उंच करून **अस्तन्या कोंपऱ्यापर्यंत मागें सरलेल्या,** आपले दोन्ही हात हलके हलके चोळीत, त्या हातांच्या पोकळीतून लेखकाच्या ओंजळींत पसाभर उदी सळसळ करीत सहासात इंचांच्या उंचीवरून त्यांनीं सोडली, आणि नंतर त्यांनीं त्याला आलिंगन दिलें.

हा प्रकार पाहून सेवक दिङ्मूढ झाला. डोळयांत प्रेमाश्रु आले. "अरे, पाहा पाहा, पाहा ही माझ्या साइमाउलीची लीला! लुटा! लुटा!"

सर्व मंडळी धांवून आली व त्यांनीं सर्वांनीं ती उदी घेतली. कोणी एकानें एक कागदाचा तुकडा आणला. त्यांत ती उदी लेखकानें घातली. तो कागद उदीसह त्यांतल्या एका गृहस्थानें लांबवला, तेव्हां लेखक काव्यावाला करीत बोलला, "अहो, मला एक चिमूटभर उदी तरी द्या!" तेव्हां त्याला एक चिमूट उदीची मिळाली.

हा प्रकार चालला असतां प्रोफेसरसाहेब उद्गारले, "can your science explain this?" तुमचें पाश्चात्य शास्त्र याचा उलगडा करील काय? कसलें पाश्चात्य शास्त्र? आणि कसला त्या द्वारें उलगडा!

त्यानंतर या गृहस्थाविषयीं श्रीसाइलीलेंत हा घडलेला प्रकार छापूं नये, कां, तर त्यामुळें वरील गृहस्थाच्या पाठीमागें विनाकारण प्रसिद्धीचा लकडा लागून त्याला त्रास व्हावयाचा संभव आहे, असें एका सन्माननीय विद्वान गृहस्थाचें आग्रहपूर्वक सांगणें झाल्यावरून या अद्वितीय रत्नाचें नांव न छापतां ही हकीकत जनतेपुढें मांडावयाचीच असा लेखकानें आपला अभिप्राय दिला.

ही श्रीसाईमाउलीची प्रत्यक्ष घडलेली लीला जर न छापावयाची, तर प्रसिद्ध करावयाचें तें काय? " जिन्नें पाया उन्नें छुपाया " हें त्या सन्माननीय मित्राचें मत. कां? तर असें प्रसिद्ध केल्यानें त्याच्या सामर्थ्याला विघ्न येतें. असेल! पण तें केव्हां? जर असा सामर्थ्ययुक्त पुरुष आपलें सामर्थ्य दाखवावें या अहंभावनेनें प्रेरित होऊन तो तें दाखवील तर कदाचित् तसें तें सामर्थ्य हळुहळू लुप्त होईल. परंतु सद्गुरुप्रेमानें परिप्लुत होऊन, सद्गुरुप्रेरणेनें देहभान विसरून, तो तसें आचरण जनहितार्थ करील, तर त्याचें तें सामर्थ्य हळूहळू लुप्त न होतां वृद्धिंगत झालेंच पाहिजे असें लेखकाला ठाम वाटत असल्यामुळें, तो हा घडलेला प्रकार जनतेपुढें मांडीत आहे.

वरील सर्व गोष्टींचा विचार करून श्रीसाईमाउलीच्या या अद्वितीय रत्नानें दाखविलेली श्रीसाईमाउलीची अघटित लीला लेखक अत्यंत आनंदयुक्त भावनेनें व प्रेमानें जनतेपुढें सादर करीत आहे.

ज्या कोणाही वाचकास केवळ निस्सीम जिज्ञासायुक्त अंतःकरणानें या श्रीसाईमाउलीच्या लेंकराची भेट घेणें असेल, त्यानें वर दर्शविलेल्या कोणाही गृहस्थाकडे त्याप्रमाणें विचारपूस केल्यास त्याला त्यांचें नांव व राहतें ठिकाण याची माहिती मिळेल.

केवळ दिशाभूल न व्हावी, या हेतूनें इतकेंच येथें कळविण्यांत येतें कीं नगर जिल्ह्यांत कर्जत तालुक्यांतल्या एका गांवांत यांची वस्ती आहे. आणि श्रीशिरडी येथील श्री. तात्या पाटील, सगुण, वगैरे मंडळीला यांच्या सामर्थ्याची पूर्वीपासून पूर्ण जाणीव आहे.

सोमवारीं सकाळीं लेखक रा. सा. बोरावके यांजबरोबर त्यांचा अकलुज येथील साखरेचा कारखाना पाहण्यासाठीं निघण्यापूर्वी वरील सद्गृहस्थाची भेट लेखकानें कै. श्री. दीक्षित यांच्या वाड्यांत घेतली. त्या वेळीं त्यांनीं प्रेमानें त्याचप्रकारें लेखकाला भरपूर उदी दिली, जी त्यानें जपून ठेवली आहे.

आतां विचारांचें काहूर माजतें. हा हातचलाखी अथवा हिप्नॉटिझम् म्हणजे नजरबंदीचा प्रकार आहे काय ? ज्या (Rope trick) म्हणजे दोरावरून अधांतरीं आकाशांत `जाणें हा प्रयोग पाहण्यासाठीं पाश्चात्यांनीं हजारों रुपये देऊं केल्याचें आपण वर्तमानपत्रांत वाचतों, आणि जो प्रयोग Mass Hypnotism ( समुदायाला नजरबंद करणें) याचा एक भाग आहे, आणि त्याप्रमाणें गोष्ट खरी नसतां स्वप्नाप्रमाणें सर्वांना त्या वेळीं ती खरी वाटत असते, आणि नंतर आपण पाहिलें, हा केवळ भास मात्र मनांत राहतो. तशांतला वरील प्रकार क्षुद्र नाहीं. कारण सर्वांच्या हातांत ती उदी साक्षीभूत बसलेली आहे.

हातचलाखीची गोष्ट म्हणावी, तर दोन्ही हात उघडे, कोंपरापर्यंत अस्तन्या मागें सरलेल्या, हात कोंपरापासून वर उचललेले. "हात पसर" म्हणेपर्यंत दोन्ही हात अलग. "दत्त गुरु, दत्त गुरु" हा सारखा जप, शरीर पुलकित, चर्या आनंदित, प्रेमयुक्त; लेखक हात जोडून ओंजळी पुढें करीत असतां तिच्यांत त्यांच्या त्या हात चोळण्याच्या कृतींतून भरभर उदी पडावी, ही नजरबंदी Hypnotism खास नव्हे. हा प्रयोग लेखकानें त्या शनिवारीं आणि नंतर सोमवारीं सकाळीं प्रत्यक्ष अनुभविला. शनिवारीं रात्रीं कीर्तनप्रसंगीं लेखक हजर नव्हता. परंतु अनेकांनीं तो अनुभव घेतला. ती त्या वेळीं त्यांना मिळालेली उदी प्रत्यक्ष चक्षुर्वै: सत्यं या न्यायानें प्रमाणभूत साक्ष. बरें, गडी पहावा तर अत्यंत साालस, भिडस्त, निगर्वी वृत्तीचा. नाहीं कोणत्याही प्रकारचा अभिमान. पण त्या किलकिल्या डोळ्यांत प्रेम ओतप्रोत भरलेलें. वृत्ति अत्यंत अयाचित्. आधि-व्याधिग्रस्त गोरगरिबांना सहाय्य करणें हें आद्य कर्तव्य.

असो ! जारणमारणादि सिद्धि साध्य असूनही त्यांच्या मोहपाशांत न पडतां, जनताजनार्दनाची सेवा घडावी हेंच जीविताचें सार्थक. याप्रमाणें वाचकहो, आपणांपैकीं त्या स्थितींत असतां तसें कोण करील ?

आतां विचारांचें काहूर माजतें:—

१ ही त्यांच्या हातांत उदी येते कशी ?

२ कोणीं पिशाच्च त्यांना साध्य आहे काय ?

( हें पिशाच्च म्हणजे श्रीकौसल्यामातेच्या तिच्या गर्भात पूर्वजन्म जडलेलें तेंच हें श्रद्धाळु हिंदवासियाला सहज कळतें.)

३ Cosmic Energy म्हणजे सृष्टि चालविणारी शक्ति—जिला आपण माया, महालक्ष्मी, काली, भवानी, अन्नपूर्णा, जगज्जननी इत्यादि अनेक नांवांनीं तिच्या गुणधर्माप्रमाणें संबोधितों, ती प्रचंड शक्ति कोणत्या पाश्चात्य शास्त्रानुसारें ही उदी त्यांच्या हातांत निर्माण करिते ?

४ केवळ शून्यापासून या उदीची उत्पत्ति ?

५ अथवा कोणत्या तरी क्षेत्रापासून ही कोणाच्या द्वारें त्यांच्या हातांत येऊन पडते ?

६ वरील प्रश्नाचें उत्तर गृहीत धरल्यास त्या ठिकाणी सदरील उदी कमी व्हावी. असें होतें काय ?

७ हे प्रकार दाखविण्यांत मूळ हेतु, "अरे बाबा, दूर आहेत काय ?" या शब्दांनीं स्पष्ट होत नाहींत काय ? जेणें करून श्रीसाईमाउलीविषयीं प्रेम, आस्था, व ते हृदयस्थ आहेत, तेच या शरीराचे, मनाचे, बुद्धिचे खरे मालिक या जाणीवेला दुजोरा मिळून त्यामुळें आत्मविश्वासाला प्रोत्साहन मिळत नाहीं काय !

असे अनेक प्रकारचे प्रश्न उपस्थित होतात; ज्याविषयीं साधक-बाधक खुलासा पाश्चात्य शास्त्रद्वारें कोणी लिहून पाठविल्यास त्याचे वाचक-वृन्दावर उपकार होतील.

खार, ९–५–३५ संपादक

# श्री. सौ. इंदिराबाई पेंढारकर यांचे अनुभव

व

# श्री. रावसाहेब नरहर रामचंद्र घाटे सब असिस्टंट सर्जन, सिव्हिल हॉस्पिटल, राजकोट, यांचा अनुभव

## श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योन्नमः

श्रीसाईलीला संपादक महाशय यांसः—

सप्रेम कृ. शि. सा. न. वि. वि. माझा-आपला परिचय नाहीं. पण मी आपल्यास श्रीक्षेत्र शिरडी येथें दोन वेळ पाहिलें आहे. मी श्रीसाईबाबांचे चरणाजवळ फक्त दोनच वेळ आलें होतें. ठाण्याचे देव मामलेदार व त्यांचें कुटुंब यांच्याबरोबर आलें होतें. देव मामलेदारांचें कुटुंब माझ्या आत्या लागतात. मी पेंढरीची राहणारी आहें. पेंढरी हा गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील देवगड तालुक्यांत आहे.

सन १९१७ सालीं देव मामलेदार चिखलींहून बदलून ठाण्यास आले. त्या वेळीं मी ठाण्यास होतें. मी त्यांच्याकडे नेहमीं जात-येत असें. त्यांच्याकडे आलें, म्हणजे ती मंडळी श्रीसमर्थ साईबाबाची उपासना करतात व त्यांच्या दर्शनाकरतां शिरडीस जातात, हें मला दिसे. बाबा ह्यात असतां बाबांच्या दर्शनाला येण्याकरितां माझ्या सौ.आत्याबाई मला नेहमी आग्रह करीत. पण मी अभागी व दुर्दैवी म्हणून त्यांच्या शब्दाला मान देऊन मी बाबांच्या दर्शनास गेलें नाहीं. बाबा समाधिस्थ होऊन १०–११ वर्षें झालीं. तेव्हां पुनः माझ्या सौ. आत्याबाईंनीं, मी तुम्हाला श्रीसद्गुरु साईबाबांच्या समाधि-दर्शनाला घेऊन जाणार असें ठरविलें त्याप्रमाणें मी सन १९२९–३० सालीं प्रथम शिरडीस त्यांच्याबरोबर गेलें. पण माझ्या जिवाला हळहळ

वाटूं लागली कीं, आतां मी आलें काय व नाहीं आलें काय सारखेंच कारण बाबा आतां **हयात नाहींत.** ते हयात असतांना सौ. आत्याबाईची मुलगी चि. ताई शिरडीस जाते वेळीं मला आग्रह करून गाडींत खेंचीत होती. तरी मीं शिरजोरपणानें येत नाहीं असें म्हटलें. त्याबद्दल मला वाईट वाटून पश्चात्ताप होई. असो. नंतर मी वर लिहिल्या तालीं शिरडीस गेलें व बाबांच्या पुण्य समाधीचें दर्शन घेतलें. -

मी शिरडीहून परत आल्यावर पेंढरीस गेलें. तेथें मला असें स्वप्न पडलें कीं, मी ठाण्यास सौ. आत्याबाईच्याच घरीं आहें. ( त्या वेळीं त्या हल्लीं जेथें ब्राह्मण सभा आहे, त्या घरांत राहत होत्या, ) तेथें माडीवरील एका बह्यालावर ( on a beam ) एक मातीचें चित्र स्वच्छ पांढरी कफनी घातलेलें मनुष्याकाराचें निजलेलें मीं पाहिलें. तें एका हातावर मान ठेवून एक पाय लांब करून दुसरा पाय त्यावर ठेवून एका कुशीवर निजल्या प्रमाणें दिसलें. पण त्याचे डोळे जाग्या माणसासारखे सतेज दिसत होते. मी त्याकडे एकसारखी नजर देऊन पाहात आहें, तों ते श्रीसच्चिदानंद सद्गुरु बाबा बह्यालावरून उठून घरांत उतरले व नंतर एक जिना उतरून खालीं एका नळावर कपडे धुवून स्नान करून पुन्हा वर आले व पुन्हा पूर्वीच्या बह्यालावर होते तिथें जाऊन वर सांगितल्याप्रमाणें एका हातावर डोकें, डोळे उघडे, व एका कुशीवर असे निजले. हें सर्व पाहून तेथें सौ. आत्याबाईचे पुतणे चि. वसंतराव म्हणून होते, त्यांना मीं हाक मारून जवळ बोलाविलें व अतिशय कळकळीनें सांगूं लागलें कीं, हे बह्यालावरील श्रीसच्चिदानंद सद्गुरु बाबा तुम्ही निर्जीव समजाल तर चुकाल; ते सजीव आहेत. वसंतरावांना ह्या माझ्या बोलण्याचें नवल न वाटतां ते मला असें म्हणाले कीं, ते निर्जीव नसून तुमच्या समजुतीप्रमाणें सजीव असले, तरी त्यांच्यापासून आमचा तोटा न होतां उलटें रक्षणच होईल. हें ऐकून मी विचारी निरुत्तर होऊन गप्प बसलें.

बाबा समाधिस्थ झाले. ते हयात नाहींत. आतां मी शिरडीस गेलें काय व न गेलें काय, सारखेंच अशी जी माझी समजूत झाली होती, ती नाहींशी करून मी जिवंत आहें जागृत आहें, तुझ्या जवळ आहें, तुझ्या घरांत आहें, व तुमचें सर्वांचें संरक्षण करीत आहें अशी वरील स्वप्नानें माझी स्पष्ट समजूत करून दिल्यामुळें मला अत्यानंद वाटला. बाबांच्या नित्य जिवंतपणाची याहून आणखी अधिक साक्ष ती कशी पटावयास पाहिजे ?

## अनुभव २

सन १९३० सालची गोष्ट. मी एकदा पंढरींत कानाच्या दुखण्यानें आजारी होतें. त्या वेळीं कानाच्या दुखण्याचा वेग ( दुखण्याच्या वेदना ) अगदीं असाह्य होऊन मला मुळींच चैन पडेना. तेव्हां हे साइमाउली तुझ्यावाचून आतां मला कोणी नाहीं, असें म्हणून मी खालीं डोकें टेकलें, इतक्यांत मला थोडीशी गुंगी आली. त्या गुंगींत मला एक स्वप्न पडलें. एका तंबूंत अतिशय गर्दी असून मी त्यांत गुरफटून गेलें आहे. इतक्यांत एक म्हातारा डोकीस रुमाल घातलेला, अंगांत बाराबंडी घातलेली व तुमान घातलेला असा मजजवळ आला व मला हात देऊन त्यानें मला त्या गर्दी-तून बाहेर काढलें व बाबांचा रथ ज्या जागेंत ठेवतात त्या निवांत जागेंत त्यानें मला नेलें. तेथें गेल्यावर मला तेथेंच निजावेंसें वाटलें. मी निजलें. पण हे गृहस्थ ( म्हातारा ) माझ्या पाठीशींच निजले. मला तेथून उठावेंसें वाटलें. मी उठून तशीच पुढें चालत गेलें, तो पुढें दोन गादीचे बिछाने घालून ठवलेले मीं पाहिले. तेथें एक मुसलमानाची बाई बसली होती. त्या बाईस मीं विचारलें कीं, मी येथें निजूं का ? ती म्हणाली, "खुशाल निजा ! तुम्हा यात्रेकरूंसाठींच हे बिछाने घालून ठेविले आहेत." नंतर ती बाई मला म्हणाली कीं, "तूं इतकी फिकीर का करतेस ? चार पैशाची कडु-लिंबाची फळें खा, म्हणजे तूं बरी होशील." इतकें ऐकून मी जागी झालें. इतक्यांत कोणी एकानें मला एक औषध आणून दिलें. तें मीं घेतलें व मी तावडतोब त्या दुखण्याच्या त्रासांतून सुटलें. तेव्हांपासून आज पावेतो पुन्हा माझा कान दुखला नाहीं. संकटसमयीं अंतःकरणपूर्वक बाबांना

आठवण्यांचा केल्यास बाबा आपलें संकट निवारण करून आपल्यास कशी सुख शांती देतात, त्याचा हा प्रत्यक्ष चमत्कार नव्हे का ?

## अनुभव ३

सुमारें एका वर्षापेक्षां जास्त दिवस झाले असतील. मी पेंढरींतचा होतों. एके दिवशीं माझ्या दोन्ही दंडांवर दाभणानें टोंचल्याप्रमाणें मल दुःख होऊं लागलें. पेंढरींत राहूं नये असें वाटे. या दुःखाला काय उपाय करावा तें सुचेना. कोणास सांगितलें, तर खरेंही वाटणार नाहीं. हा विचार होता. माझ्या उजव्या दंडावर अजून त्या विचाराच्या दोन खुणा आहेत डाव्या दंडावर कांहीं खूण नाहीं. त्या विचाराच्या इतक्या भयंकर वेदना मला होऊं लागल्या कीं, मी यांतून जगणें शक्य नाहीं असें मला वाटूं लागलें. "बाबा, कोणी करणी केली असल्यास, माझें दुखणें बंद होऊं द्या, मी तुम्हांस दरवर्षी अडीच रुपये (रु. २–८- ०) देत जाईन," असें मीं बाबांना दीन स्वरानें म्हटलें. मी बाबांना हा नवस केला. त्यानंतर २–३ दिवसांनीं आमच्या पेंढरी गांवापासून सुमारें ४ कोसांवर असलेल्या किंजवडे गांवचे एक वयोवृद्ध श्री. अप्पा ठाकूर या नांवाचे ब्राह्मण आमच्या घरीं आले. त्यांनीं माझें हें दुखणें पाहिलें व एका क्षणाचाही विलंब न करतां रानांत जाऊन एका वनस्पतीचा पाला आणून वाटून दुःखाच्या ठिकाणीं दोन्हीं दंडावर लावला व म्हणाले कीं, "मला काय कळतें आहे? तुझें दुखणें किंजवडयाचा तो धानेश्वर महादेव बरें करील." चमत्कार हा कीं, दोनतीन दिवसांत माझें दुखणें साफ बरें झालें व मला अत्यंत आराम वाटला. नवसाप्रमाणें मी गेल्या सालीं २॥ रुपये बाबांकडे पाठविले, व आतां या वर्षाचेही आणिले आहेत, ते आपल्याकडे पाठवीन. संकटसमयीं बाबांचा आठव केला, म्हणजे ते कसे धांवून येतात त्याचें हें दुसरें प्रत्यंतर आहे.

## अनुभव ४

अजमासें वर्ष झालें असेल नसेल. एके दिवशीं मी पेंढरींत असतां मला पुन्हा स्वप्न पडलें कीं, श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबा नाटकाच्या रंगभूमी-

वर कीर्तन करीत आहेत. मी व ती सौ. आत्याबाई व ती. काका ( देव-मामलेदार ) असे आम्ही तिघे त्यांचें कीर्तन ऐकण्यास तेथें जाऊन बसलों. इतक्यांत जरा वांकून, दोन पावलें पुढें येऊन, मजकडे पाहून, बाबांनीं जपाची माळ हातांत घेऊन, दोनचार मणी ओढून दाखविले. त्यावरून माळ घेऊन त्यांचें स्मरण करीत जा असें त्यांनीं मला सांगितलें, असें मला वाटलें. तेव्हांपासून मी बाबांच्या नांवाचा एक माळ जप करतें व त्यांना एक माळ प्रदक्षिणा घालतें. मला वाटतें हा मला उपदेश किंवा शिकवणूक आहे; नाहीं तर साईमाउलीवांचून इतक्या प्रेमानें व कळकळीनें स्वप्नांत दर्शन देऊन सांकेतिक खुणेंत शिकवणूक कोण देणार !

## अनुभव ५

मारें ७–८ महिने झाले असतील; पेंढरीत मला एके दिवशीं स्वप्न पडलें कीं, मी अंथरुणावर निजलें असतां एक काळा भिल्ल पांढरें धोतर नेसून कांचा मारून दोन दंडावर हात ठेवून माझ्या उशाजवळ उभा राहिला. आतां हा पुरुष मला मारणार हें पाहून "बाबा. हें काय !" म्हणून मी मोठ्यानें ओरडल्याबरोबर बाबा तेथें दिसले. मी त्यांच्या पायावर डोकें ठेविलें. बाबांनीं रागानें त्या पुरुषाकडे डोळे वटारून पाहिलें व त्याला तेथून घालवून दिलें. मला वाटतें माझ्यावर येऊं पाहणारें अरिष्ट बाबांनीं टाळलें. काय ही साइमाऊलांची अतर्क्य लीला ! !

आपल्या श्रीसाईलीलेंत योग्य वाटल्यास वरील अनुभव कृपेनें प्रसिद्ध करावे. तूर्त इतकेंच पुरे. यथाअवसर पुढें आणखी देईन.

ठाणें,
ता. २८-३-३५
गुरुवार.

आपली गरिब व नम्र कन्या
सौ. इंदिराबाई कृष्णराव पेंढारकर
( किंवा सौ. दुर्गाताई मुकुंदराव देवस्थळे )

श्रीदत्तचित्साइसद्गुरुभ्योन्नमः

श्रीसाइलीला संपादक महाशय यांस सप्रेम कृ. शि सा. न. वि. वि. खालील अनुभवास श्रीसाईलीलेच्या एखाद्या अंकीं प्रसिद्धि देण्यास सविनय प्रार्थना आहे.

# बाबा करजगांवांत, बाबा राजकोटांत

## रावसाहेब नरहर रामचंद्र ऊर्फ दादासाहेब घाटे, सब अमिस्टंट सिव्हिल सर्जन, राजकोट, यांचा अनुभव

आम्ही श्री. गिरनारला जाण्याकरितां ता. २७–२–३५ रोजी मुंबई-हून निघून ता. २८–२–३५ रोजीं राजकोट येथें रावसाहेब डॉक्टर घाटे यांच्या घरीं गेलों. त्यांच्याकडे चार वेळा मिळून आम्हीं ७–८ दिवस राहिलों. आम्ही नेहमीं शिरडीला जातों, हें डॉक्टरसाहेबांना माहित होतें. डॉक्टरसाहेब माझ्या कुटुंबाचे मावसबंधु. आम्ही सर्व त्यांना नरहरीमामा म्हणतों. नरहरीमामांचें कुटुंब, तीन मुली व तीन मुलगे या सर्वांना बाबांच्या लीला ऐकण्याची फार हौस. तिकडे सर्वच गुजराती बोलणार. मामांच्या घरांत गुजराती व मराठी दोन्ही भाषा. आम्ही त्यांच्या घरीं गेल्या-वर सर्वांनींच एकसमयावच्छेदेंकरून "काका बाबांनी वार्ता कहो, काका, बाबांनीं वार्ता कहो" असा मजजवळ एकच प्रेमाग्रह केला. तीं सर्वच शाळेंत जाणारीं मुलें. सौ. मामी गृहकार्यव्यापृत. करितां त्यांच्या रिकाम्या व फुरसतीच्या वेळांत मी त्यांना दररोज बऱ्याचशा बाबांच्या लीला सांगत असे. त्याचें त्यांना फार सानंद कुतूहल वाटे.

एक दिवस लीला सांगतां सांगतां श्रीसाईसच्चरितांतील ३६ व्या अध्यायांतील गोमंतकस्थ दोघां भक्तांची अनुभवकथा मीं त्यांना सांगितली. त्या कथेवरून डॉक्टर नरहरीमामांना व सौ. मनोरमाबाईमामींना त्यांनी १६ वर्षांपूर्वी बाबांना केलेल्या नवसाची आठवण झाली व आपली ही स्थिति गोमंतकस्थ गृहस्थाप्रमाणे होणार कीं काय, असें वाटलें. त्यांना नवसाची अगदीं आठवण नव्हती असें नाहीं. पण बाबांची व्याप्ति जर सर्वत्र ठिकाणीं आहे, तर आपण केलेल्या नवसाची रक्कम कोणत्याही एखाद्या चांगल्या धार्मिक संस्थेकडे पाठवून दिली म्हणून काय हरकत आहे असें त्यांना वाटून त्यांनीं ती रक्कम त्यांना माहित असलेल्या

दोनतीन संस्थांपैकीं एका संस्थेकडे पाठविण्याचें ठरविलें. पण नवसाच्या अनिश्चितपणामुळे म्हणा, किंवा ती रक्कम आपल्याकडेच आली पाहिजे अशी त्या साईपरमात्माच्या इच्छेमुळें म्हणा, ती रक्कम दुसऱ्या कोणत्याही संस्थेकडे न जातां त्यांच्याकडे ती आजपर्यंत तशीच राहिली.

परंतु मी सांगितलेला वरील अनुभव ऐकल्यापासून मात्र त्या उभयतांच्या मनास विशेष तळमळ लागून आतां ही रक्कम मला देऊन आपण नवसांतून मुक्त व्हावें अशी त्यांच्या मनानें फार उचल खाल्ली. आम्हीं राजकोटहून ठाण्यास येण्याकरितां निघण्याच्या आधल्या दिवशीं रात्रीं डॉक्टरसाहेबांनीं आपल्या कुटुंबास सांगितलें कीं, ह्यांना (मला) ती ५१ (एकावन्न) रुपयांची रक्कम देऊन टाका. त्याही म्हणाल्या कीं होय; आतांच देतें. मीं म्हटलें, मला ह्या नवसाची पूर्वपीठिका सांगा, म्हणजे मी रक्कम घेतों.

रावसाहेब नरहरीमामा म्हणाले, "अजमासें १६–१७ वर्षे झालीं असतील; मी त्या वेळीं सुरत जिल्ह्यांतील एका करंज नांवाच्या गांवीं सरकारी दवाखान्यांत डॉक्टर होतों. तो सर्व गांव पार्शी वस्तीचा आहे. मला त्या वेळीं ४५ रुपये पगार मिळत असे. त्या सुमारास माझी कार्यनैपुण्यार्गलेची (एफिशिअन्सी बार) पंचवार्षिक परीक्षा आली होती, पण गांवांत हवा बिघडली होती व साथीचा रोग उत्पन्न होण्याची भीति होती; त्यामुळें परीक्षेचा अभ्यास करण्यास मला मुळींच फुरसत मिळेना. मला आमच्या हुजूरकचेरीतून लिहून आलें कीं, मला कार्यनैपुण्यार्गलेच्या परीक्षेस त्या वर्षीं बसलेंच पाहिजे, नाहीं तर बढती मिळणार नाहीं. वरील कारणें देऊन पुढच्या वर्षी परीक्षेस बसण्याची मीं परवानगी मागितली. ती मला मिळाली. पुढचें वर्ष उजाडलें, परीक्षेची वेळ आली, तरी वरील कारणामुळेंच मला परीक्षेचें पुस्तकही उघडण्यास वेळ मिळाला नाहीं. रात्रंदिवस कामाची अतिशय गर्दी असे. आतां पुन्हा पुढच्या वर्षाची परवानगी मिळणार नाहीं, व आतां परीक्षेस बसलेंच पाहिजे अशी स्थिति झाली. काय करावें तें सुचेना. श्री. रुस्तमजीशेट म्हणून एक पार्शी गृहस्थ मजकडे नेहमी येत असत.

एके दिवशीं मी असा विचार करीत बसलों असतां मासिक मनो-रंजनचा अंक माझ्या हातीं आला. त्यांत शिरडीच्या श्रीसाईबाबांचा फोटो दिलेला होता, त्याकडे मी पाहूं लागलों. वरील श्री. रुस्तमजी पार्शी शेटजी त्या वेळीं मजकडे आले होते. त्यांच्यासमक्ष मी म्हटलें कीं, मी जर ही परीक्षा पास झालों, तर मी हा महाराजांचा फोटो एकावन्न रुपयांच्या चांदीच्या आवेष्टनांत ( फ्रेममध्यें ) बसवीन. रुस्तमजी शेट हंसून म्हणाले, "डॉक्टर-साहेब, तमे तो कोई दहाडे परीक्षानी चोपडी खोलता पण नथी, अने तमे केवी रीते पास थशो !" मी म्हटलें, "मीं केवळ श्रीसाईबाबांच्या फोटोच्या भरवशावर परीक्षेस बसणार आहें."

नंतर मी खरोखरच एकही पुस्तक न वाचतां परीक्षेस बसलों. आपण परीक्षेंत पास होणार नाहीं ही खात्री. पण बाबांवर भरंवसा. चम-त्कार असा कीं, मी परीक्षा पास झाल्याबद्दल मला माझ्या हुजूरकचेरींतून लिहून आलें, तेव्हां मी पासच कसा झालों याचें मला राहून राहून नवल वाटूं लागलें व खरोखरच बाबांच्या अतर्क्य लीलेचें सानंद कौतुक वाटलें.

या नवसाची आम्हा उभयतांस आठवण होती; पण रात्रंदिवस कामाचा चेप असल्यामुळें फोटोस चांदीचें आवेष्टन करून घेण्यास संधि मिळेना. पुढें कांहीं दिवसांनीं तो फोटो कोठें गेला त्याचाही पत्ता लागेना.

मी जरी त्या फोटोची रोज पूजा करीत नव्हतों, तरी सकाळीं उठल्याबरोबर त्या फोटोचें प्रथम दर्शन घेतल्यावांचून कधींही राहत नसें. अशी या नवसाची हकीकत आहे. मला आतां बाबांचा फोटो पाठवा.

असें नरहरीमामांनीं सांगितल्यावर त्यांच्या कुटुंबानीं गजजवळ ५१ (एकावन्न)रुपये आणून दिले. नंतर त्यांनीं व सर्व मुलांमुलींनीं "अमोने पण फोटो मोकलजो काका" असें मला मोठ्या प्रेमभक्तीनें सांगितलें. नर-हरीमामा फोटोचें नित्य दर्शन घेण्यास व सौ. मनोरमाताई फोटोची

नित्य पूजा करण्यास चुकणार नाहींत,पण तुम्हीं प्रत्येकानें बाबांच्या फोटोस दररोज नियमानें एक तुलसीपत्र वाहिलें पाहिजे असें मी मुलांमुलींना बजावून सांगितलें व त्यांना एकंदर नऊ फोटो निरनिराळ्या वेळचे व बैठकींचे आतांच पाठवून दिले. मासिक मनोरंजनांतील फोटोप्रमाणें जो फोटो होता. तो डॉक्टरसाहेबांनीं स्वतःकरितां ठेविला व बाकीचे फोटो प्रत्येकाला एकेक प्रमाणें वांटून देऊन जास्त शिल्लक राहिलेला एक फोटो त्यांच्या नवऱ्या मुलीकरितां ठेविला आहे. बाबांच्या कृपेनें नरहरीमामा "रावसाहेब" होऊन त्यांना हल्लीं २०० रु. पगार मिळत आहे.

वरील एकावन्न रुपयांची रक्कम त्यांनीं गायनफंडाकडे भरली आहे, ती यासोबत आपल्याकडे पाठवीत आहें, तिचा स्वीकार करून त्या रकमेची पोंच "रावसाहेब नरहर रामचंद्र घाटे, सीनियर सब असिस्टंट सर्जन, राजकोट सिव्हल हॉस्पिटल" या पत्त्यावर परभारें पाठवून सवडीप्रमाणें मला कळविण्याची कृपा व्हावी.

बाबांचा लीलानुभवसुगंध ज्यांत भरला आहे, असें हें वाक्सुमन त्याच श्रीसाईजननीच्या चरणकमलीं अत्यादरानें अर्पण करून आपली रजा घेतों.

ठाणें, चैत्र शु. १
गुरुवार शके १८५७;
४–४–३५

संतचरणरज दासानुदास
बालकृष्ण विश्वनाथ देव

श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

# बाबा हिंदु का मुसलमान व बाबा व सखारामहाराज कवाडकर गुरुबंधु होते कीं काय? असल्यास कसे?

श्रीसाईलीला संपादकमहाराज यांसः—

सप्रेम कृ. शि. सा. न. वि. वि. गत सालच्या साईलीलेच्या २–३–४ या जोड अंकांत श्रीमती विदुषी काशीबाई कानिटकर यांनी १९०९ ते १९१३ च्या दरम्यानच्या कालांत बाबांच्यासंबंधानें त्यांना आलेले अनुभव दिले आहेत. ते मी लक्षपूर्वक वाचून त्यांच्या मनांत व त्याबद्दलची सामग्री मिळविण्याच्या शोधांत होतों. इतक्यांत श्रीयुत रा. ब. वामर्डेकर यांचें आपल्यास आलेलें ता. ता. २८–९–३४ चें पत्र आपण मला दिलें, तें मी काळजीपूर्वक वाचलें.

श्रीमती काशीबाई यांच्या अनुभव नंबर ८ व ५ वरून बाबांनी स्वतः दोन गोष्टींचा खुलासा केल्याचें दिसतें.

## पहिला—अनुभव नंबर ८

छातीला हात लावून बाबा त्यांना म्हणाले, हा **ब्राह्मण** आहे. **शुभ्र ब्राह्मण** आहे. काळ्या वस्तूचा याला संबंध नाहीं. हा **शुद्ध ब्राह्मण.** मुसलमान तेथें पाऊल काय ठेवील? त्याची बिशाद काय तेथें येण्याची? हा **ब्राह्मण** ( छातीला पुन्हा हात लावून ) लाखोंजणांना शुभ्र मार्गावर लावून पोंहोंचविणारा आहे. शेवटपर्यंत पोहोंचविणारा आहे. **ही ब्राह्मणाची मशीद आहे.** ह्या मशीदीवर काळ्या मुसलमानांची सावली सुद्धा पडूं देणार नाहीं.

यावरून बाबा हिंदु असून स्मृतिकारांनी ब्राह्मण शब्दाची जी यथार्थ व्याख्या केली आहे, त्याप्रमाणें खरें खरें ब्राह्मण होते असें स्पष्ट दिसतें!

जन्मना जायते शूद्रः । संस्कारैर्द्विज उच्यते ॥
कर्मणा याति विप्रत्वं । ब्रह्मजानाति ब्राह्मणः ॥

—मनुस्मृति अध्याय १, श्लोक ३१

इतकेंच नव्हे, तर ते लाखोंजणांना ब्राह्मण करून सोडणारे होते. त्यांनीं भगवीं वस्त्रें धारण केली नव्हतीं, तरी ते श्रीमद्भगवद्गीतेंत अ. ५, श्लो. ३ यांत "ज्ञेयःस नित्य सन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति" व अ. ६ श्लो. १ यांत "अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः । स सन्यासीच योगीच निरग्निर्नचाक्रियः" लिहिल्याप्रमाणें खरे खरे सन्यासी व योगी होते. त्यांची मशीद ब्राह्मणाची आहे व ती खरोखरीच ब्राह्मणाची आहे. कारण, बाबा तिला नेहमीं द्वारका, द्वारकामाई, द्वारकावती, म्हणत. कधीं चुकूनही मशीद म्हणत नसत. बाबा मशिदीस द्वारका कां म्हणत असत, याचा थोडा तरी शोध लागावा म्हणून मी तीन वेळा श्री द्वारकेस जाऊन आलों; परंतु अद्याप कांहीं सुगावा लागत नाहीं !

## दुसरा:-अनुभव नं. ६

बाबांनीं काशीबाईंना विचारलें, "तुला कोपरगांवच्या दत्तानें कांहीं दिलें का ग ? तुला अनगांव कवठचा सखाराम माहित आहे का ? सखाराम व मी गुरुबंधु होतों. आम्हीं एकाच गुरूपाशीं पढत होतों. गुरूंच्या मठांत आम्ही दोघांनीं आपल्या हातांनीं आंब्यांचीं झाडें लाविलीं. त्या आंब्याचीं दोन फळें काल तुला कोपरगांवीं पाठविलीं.

त्यानंतर काशीबाई कोपरगांवास परत गेल्या. तेव्हां कोपरगांवच्या दत्तमंदिरांतील ब्रह्मचारीबोवांनी त्यांना दोन कलमी आंबे देऊन सांगितलें कीं, हे दोन आंबे बाबांनीं तुम्हाकरितां पाठविले आहेत.

यावरून खालील अनुमानें निघतात.

१—श्री. सखाराममहाराज कवाडकर व बाबा गुरुबंधु होते.

२--ते दोघे एकाच गुरूपाशीं पढत होते.

३--गुरूंच्या मठांत त्या दोघांनीं आपल्या हातांनीं आंब्यांचीं झाडें लाविलीं. ( तीं कलमीं आंब्यांचीं असलीं पाहिजेत. )

४--त्या आंब्याचीं दोन फळें काशीबाईंना देण्याकरितां बाबांनीं १९०९ सालीं कोपरगांवच्या दत्तमंदिरांतील ब्रह्मचारीबोवाबरोबर पाठविलीं, तीं त्यांना त्या कोपरगांवी परत गेल्या, तेव्हां ब्रह्मचारीबुवांनीं दिलीं.

याबद्दल कांहीं तरी सुगावा लागावा म्हणून शोधास लागलों. तों माटेकृत कवाडवासी सखारामबोवा यांचें गद्यात्मक चरित्र शके १७९३ सालांत लिहिलेलें व आपटेकृत "प्रसिद्ध साधुमहाराज" सखारामबोवा कवाडकर यांचें चरित्र शके १८१५ सालांत लिहिलेलें अशीं दोन चरित्रें उपलब्ध झालीं.

श्री. रामकृष्णबोवा माटे हे सखाराममहाराजांच्या असंख्य भक्तांपैकीं एक अत्यंत कृपेंतले प्रिय, विद्वान, योगी अधिकारी, भक्त व शिष्य होते. माटे हे सखाराममहाराजांकडे प्रथम शके १७८२ सालीं गेले व सखाराममहाराजांच्या समाधिकालापर्यंत म्हणजे १७८९ पर्यंत त्यांच्याकडे जातयेत असत. समाधिकाळींही ते महाराजांच्या जवळ हजर होते. " माझे तारक श्रीसद्गुरु सखारामचरणीं त्यांचें चरित्र, कांहीं त्यांच्या स्वमुखानें ऐकलें व अन्य लोकांपासून ऐकलें व कांहीं प्रत्यक्ष पाहिलें; त्यापैकीं कांहीं यथामति लिहितों. " असें म्हणून माटे यांनीं महाराजांचें चरित्र शके १७९३ सालीं लिहिलें आहे.

श्री. आपटे यांनीं शके १८१५ सालीं जें चरित्र लिहिलें आहे, त्याच आधार माटेचरित्राचाच घेतला आहे. या दोन्ही चरित्रांत फारसा फे नाहीं. विशेषेंकरून थोडा भाषेचा व क्वचित ठिकाणीं तपशिलाचा फरक

दिसतो, इतकेंच. रामकृष्णबोवा माटे यांनी लिहिलेलें चरित्र पुष्कळ विश्वसनीय दिसतें.

मीं या दोन्ही चरित्रांचें विशेष काळजीपूर्वक अवलोकन केलें आहे. कवाड, नाशिक व शिर्डी हीं तिन्हीं क्षेत्रें पूर्वी पाहिलीं आहेत. पण वर उद्धृत केलेल्या मुर्यांच्या संशोधनदृष्टीनीं पाहिलीं नाहींत.

या चरित्रावरून जी माहिती मिळते ती अशी:—सखाराममहाराज यांचे वडील हरिपंत केतकर चित्पावन ब्राह्मण, गार्ग्य गोत्र, दशग्रंथी विद्वान्, मातुःश्री गोपिकाबाई, राहणार परशुराम क्षेत्रांतील दाभोळजवळ करंबोवणे गांवचे.

शके १७२३ सालीं करंबोवणें गांवीं महाराजांचा जन्म झाला.

शके १७३० सालीं हरिपंतांनीं त्यांचें मौंजीबंधन केलें.

शके १७४० सालीं सखाराममहाराजांना सद्गुरु रघुनाथभट्टजी मोघे यांचें दर्शन झालें.

शके १७४२ सालीं सखाराममहाराजांचे सद्गुरु (मोक्षगुरु श्री. रघुनाथभट्टजी मोघे नाशकास समाधिस्त झाले,)

शके १७४६ सालीं सखाराममहाराज कवाडास राहण्यास आले, ते प्रथम श्री. गदाधरभट दाजी बांगुरडे अग्निहोत्रि यांच्या घरीं उतरले.

शके १७५० सालीं महाराज काशीयात्रेस गेले.

शके १७५२ सालीं काशीयात्रेहून परत कवाडास आले. तिकडून परत येतांना जालवणास जाऊन नरढयास श्रीब्रह्मानंद महाराजांचें दर्शन घेऊन खेडास आले. तेथें श्रीसमर्थ चंडिराम महाराजांचें दर्शन घेऊन परत कवाडास आले. नंतर पुढें कांहीं कालानें कार्तिकस्वामीच्या यात्रेस गेले. तिकडून परत आल्यावर शके १७७०--७२ च्या

सुमारास सखाराममहाराजांनी भिवंडी रस्त्यावर एक आंब्यांची बाग लावली.

शके १७७३ सालीं "आमचे गुरुबंधु चांडेरामबोवा खेडास असत ते आतांच समाधिस्थ झाले" असें जवळच्या कवाड येथील मंडळींना सांगून सखाराममहाराजांनी स्नान केलें.

शके १७७४ च्या सुमारास एके दिवशीं सखाराममहाराज जमलेल्या मंडळीस म्हणाले, "आमचे बंधु भेटण्यास येत आहेत त्यांस सामोरे जातों" असें म्हणून महाराज भिवंडीच्या अलीकडे जी मोठी कामोडी नांवाची नदी लागते, तिच्या कांठापर्यंत जात आहेत तोंच तिकडून भिवंडी नजीक असलेल्या निजामपूरच्या दरग्यांत पुष्कळ दिवसांपासून राहत असलेले एक कोणी मुसलमान अवलीया एकसारखे धांवत आले. महाराजांची व या अवलीयांची नदीच्या अलीकडे कवाड कडील बाजूस गांठ पडली. गांठ पडतांच दोघेही एकमेकांस कडकडून भेटले. नंतर सुमारें दोन घटका एकमेकांकडे पाहून मोठमोठ्यानें हसत राहिले. संभाषण वगैरे कांहींच झालें नाहीं. नंतर महाराज कवाडकडे गेले व अवलीया निजामपुराकडे गेले.

शके १७८९ सालीं सखाराममहाराज कवाडास समाधिस्थ झाले. ( काशीयात्रेनंतर व समाधिकालापर्यंतचे शक अजमासाचे आहेत; निश्चित नाहींत. )

## सखाराममहाराजांची परंपरा

१. श्री हरिपंत केतकर जनकगुरु. यांनी महाराजांस जन्म दिला.
२. ,, ,, ,, संस्कारगुरु यांनी महाराजांचें मौंजीबंधन केलें.

| | |
|---|---|
| ३. ,, ,, ,, | विद्यागुरु यांनीं महाराजांना संध्या, देवपूजा, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव, भगवद्गीता, विष्णुसहस्रनाम वगैरे शिकविलें. |
| नंतर ४. डहाणू तालुक्यांत चिंचणीजवळ तारापूर गांव आहे, तेथील रहिवासी श्री. जगन्नाथ शास्त्री अठल्ये पुराणिक. | विद्यागुरु यांनीं महाराजांना काव्य, व्युत्पत्ति, तर्क संग्रह, वगैरे विषय तारापुरास बर्वे यांच्या घरीं शिकविले. |
| नंतर ५. अलिबाग येथील श्री. त्र्यंबकशास्त्री शाळीग्राम. | विद्यागुरु यांनीं महाराजांस न्यायमीमांसा, व्याकरण, धर्म, वेदांत, इत्यादि विषय अलिबागेस त्यांच्या घरीं शिकविले. |
| नंतर ६. पुणें, विश्रामबाग पाठशाळेंतील मुख्याध्यापक श्री. रघुनाथशास्त्री. | विद्यागुरु यांनीं महाराजांना तर्कदीपिका, मुक्तावलि, त्यावरील टीका व न्याय वगैरे विषय पुण्यास शिकविले. |
| नंतर ७ श्री. पांडोबा केतकर, महाराजांचे वडिलबंधु. | यांनीं महाराजांस तारापूर येथें हठयोगांतील धोती बस्ती नेती इत्यादि षट्क्रिया प्राणायाम व आसन इत्यादि विषय शिकविले. |
| नंतर ८. श्री. रघुनाथभट्टजी मोघे, कऱ्हाडे ब्राह्मण, नाशिक येथें राहणारे. | हे सखाराममहाराजांचे मोक्षगुरु यांनीं महाराजांना दर्शन देऊन त्यांचें शंकासमाधान ( तारापूर येथें ) करून अंतर्धान पावले. |

श्री रघुनाथभट्टजी मोघे हे प्रथम अध्ययनाकरितां नाशकास आले. हे महाविद्वान्, महासाक्षात्कारी, महायोगी व अत्यंत अधिकारी पुरुष होते. यांना सप्तशृंग येथें श्रीदत्तात्रयांनीं साक्षाद्दर्शन दिलें. हे नाशकास फडके यांच्या घरीं प्रथम राहत असत. नंतर फडके यांनीं त्यांचा अत्युच्च अधिकार पाहून त्यांना श्रीगोदाकांठावर दुमजली मठ बांधून दिला. त्यास भटजींचा मठ असें म्हणतात. त्यांची समाधि याच मठांत आहे. हे शके १७४२ सालीं समाधिस्थ झाले.

## श्री. रघुनाथभट्टजींची शिष्यपरंपरा

१. श्रीगंगवरील दोन मुसलमान. नांव, गांव दिलेलें नाहीं.

२. ,, एक विद्वान ब्राह्मण. नांव, गांव दिलें नाहीं.

३. ,, बापू मोघे. नंतर उज्जयनीस जाऊन राहिले.

४. ,, निरंजन बाबा. नंतर मिरजेस जाऊन राहिले.

५. ,, अच्युतरावजी मोडक; नंतर नाशकांत पंचवटींत राहिले

६. ,, नारायण बोवा. ( हे कोठले कोण व नंतर कोठें गेले याची माहिती दिली नाहीं. हे बोवाही असूं शकतील. )

७. ,, मौनी स्वामी. नंतर मुंबईस राहिले.

८. ,, नरसिंगपुरकरांचे चिरंजीव, वासुदेव भाऊ महाराज.

९. ,, पांडोबा केतकर ( सखाराममहाराजांचे वडिल–बंधु. नंतर तारापुरास राहिले.

१०. ,, रघुनाथभट्टजींचे पुतणे केशवभट्टजी. नंतर नाशकांत रघुनाथ भट्टजींच्या मठांतच राहिले.

११. ,, श्रीसखाराम महाराज. कवाडास राहिले.

श्रीसखाराममहाराज यांनी श्री. रघुनाथभट्टजी मोघे यांची अलौकिक कीर्ति त्यांचे वडील–बंधु पांडोबा यांच्या मुखांतून ऐकिली. पांडोबा हे तारापुराहून नाशकास रघुनाथ भट्टजींकडे जात असत. पांडोबांकडून कीर्ति ऐकल्यावर आपल्यास श्रीसद्गुरु रघुनाथभट्टजी यांचें दर्शन केव्हां होईल म्हणून सखाराममहाराजांना अत्यंत तळमळ लागली. तेव्हां शके १७१० सालीं सखाराममहाराज तिसऱ्या प्रहरीं तारापुरास जगन्नाथशास्त्री अठल्ये पुराणिक यांच्या घरीं पुराणिकबोवा झोंपाळ्यावर निजले असतां, जवळ उभे होते. इतक्यांत रघुनाथभट्टजींनीं त्यांना तेथें दर्शन देऊन, उपदेश करून त्यांचें शंकानिरसन करून, अंतर्धान पावले. नाशकास येऊन जें करणार, तेंच येथें करून घे, असें सांगून नाशकास येण्याचें प्रयोजनच ठेविलें नाहीं.

शके १७४२ सालीं रघुनाथभट्टजी समाधिस्थ झाले. त्यानंतर नाशकास जाऊन योगाभ्यास करावा असें सखाराममहाराजांच्या मनांत आलें. पण त्यांचे वडील बंधु पांडोबा व पुराणिकबोवा आठल्ये यांनीं त्यांना नाशकास जाऊं दिलें नाहीं. मग सखाराममहाराज शके १७४६ सालीं कवाडास आले. शके १७५२ सालानंतर सखाराममहाराज नाशकास, गंगास्नाना-करितां गेले, आठ दिवस तेथें राहिले व कवाडास परत आले. त्यानंतर ते पुन्हा नाशकास गेले नाहीत. गुरु हयात असतां किंवा त्यानंतर नाशकास जाऊन गुरुमठांत राहून पढल्याचें व आंब्याच्या झाडांचीं बाग लाविल्याचें चरित्रांत कोठेंही लिहिलें नाहीं.

| सखाराममहाराज. | बाबा. |
|---|---|
| शके १७२३ जन्म | शके १७६० लौकिक दृष्ट्या समाधिकालीं वय ८० वर्षांचें होतें असें धरून, जन्म. |
| शके १७४६ कवाडास आले. | शके १७८० शिर्डीस आले. |
| शके १७८९ समाधिस्त झाले. | शके१८४० समाधिस्त झाले |

यावरून सखाराममहाराजांच्या ३७ व्या वर्षी बाबांचा या भूलोकावर अवतार झाला. सखाराममहाराजांस रघुनाथभट्टजी गांधे यांचें दर्शन झालें व सखाराममहाराज कवाडास आले. नंतर काशीयात्रेस गेले. तिकडून परत आले, तरीही बाबांचा अवतार झालेला नव्हता. शके १७७०–७२ सालीं सखाराममहाराजांनीं आंब्यांचीं झाडें लाविलीं असें गृहीत धरल्यास बाबा त्या वेळीं १०-१२ वर्षांचे असणार. बाबा शिरडीस आले,तेव्हां १८-२० वर्षांचे होते. असें मानल्यास त्यापूर्वी ते कदाचित् कवाडचे बाजूकडे अवलीयारूपानें भिवंडीचे जवळील निजामपुरच्या दरग्यांत असूं शकतील व आंब्यांचीं झाडें सखाराममहाराजांबरोबर लावूंही शकतील. कारण निजामपूर, भिवंडी, व कवाडाजवळील, ( ज्या ठिकाणीं आंब्यांची झाडें लाविलीं आहेत ती ) पोवईची विहीर,हीं जवळ जवळ म्हणजे ३–४ मैलांच्या आंतच आहेत.

कवाड येथील सखाराममहाराजांच्या मठापासून ही पोवईची विहीर फक्त २ फर्लांग आहे. आंब्यांचीं झाडें मठाच्या जागेंत आहेत असें म्हणतां येणार नाहीं. आतां बाबा व सखाराममहाराज यांनीं तों आंब्याचीं झाडें हातानीं लाविलीं असें गृहीत धरलें तरी सखाराम महाराज यांची वर जी गुरुपरंपर- दिली आहे, त्यांपैकीं कोणत्याही गुरुजवळ सखाराममहाराजाबरोबर बाबा पढत असणें लौकिक दृष्ट्या संभवनीय दिसत नाहीं.

शिवाय माझ्या गुरूची समाधि येथें आहे असें म्हणून बाबांनीं शिरडींत साटेसाहेबांच्या ( आतां नवलकरसाहेबांच्या ) वाड्यांतील निंब- वृक्षाजवळ सवा पुरुष जागा खोदाव्यास सांगून त्याखालीं असलेली समाध लोकांना दाखवून दिली. यावरून बाबांचे गुरु निराळे होते हें निर्विवाद ठरतें व सखाराममहाराजांचे गुरु रघुनाथभट्टजी मोघे हे बाबांचे गुरु होते हें म्हणणें लौकिक दृष्टया संभवनीय दिसत नाहीं. तसेंच, रघुनाथ- भट्टजी मोघे हे नाशकास शके १७४२ सालीं समाधिस्थ झाले व बाबांचा अवतार शके १७६० मध्यें झाला; म्हणजे रघुनाथभट्टजी समाधिस्थ झाल्या- नंतर १८ वर्षांनीं झाला. यावरूनही रघुनाथभट्टजी बाबांचे गुरु होते हें म्हणणें असंभवनीय दिसतें.

व हीच गोष्ट जर असंभवनीय, तर सखाराममहाराज व बाबा हे एकाच गुरूजवळ पढत होते, व त्या दोघांनीं आपल्या गुरूच्या मठांत आंब्यांचीं झाडें लाविलीं ह्याही गोष्टी असंभवनीयच दिसतात.

तथापि चरित्रावरून असें स्पष्ट दिसतें कीं, श्रीसमर्थ सद्गुरु बाबा व सखाराममहाराज हे, कांहीं काल तरी समकालीन होते, सखाराममहाराजानीं आंब्यांचीं झाडें लाविलीं तेव्हां बाबा १२-१३ वर्षांचे किंवा १४-१५ वर्षांचे होते, व सखाराममहाराज समाधिस्त झाले तेव्हां २९ वर्षांचे होते, असें माटे व आपटे कृत चरित्रांतील शकांवरून दिसतें. दोन्ही चरित्रांतील माहितीवरून असेंही दिसतें कीं, सखाराममहाराज हे पोवईच्या विहिरी-

जवळील आंब्याच्या बागेंत एक तपापेक्षां जास्त-किंबहुना दोन तपें सुद्धा योगाभ्यास करीत होते.

बाबा प्रथम शिरडींत आले, ते निजामशाहींतील धुपखेडें गांवाहून चांदपाटलाच्या आप्ताच्या मुलीच्या लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर आले, व ते त्या वेळीं अगदीं पोरवयाने मिस्रूड न फुटलेले १६--१७ किंवा फार तर १९--२० वर्षांच्या वयाचें होते असें हल्लीं हयात असलेले शिरडीचे रहिवासी श्री. माधवराव देशपांडे व तात्या पाटील वगैरे मंडळी सांगतात.

धुपखेड्यास येण्यापूर्वी बाबा कोठें होते ह्याची माहिती अद्याप कोणासच मिळाली नाहीं. ते त्यापूर्वी निजामपुरासही असूं शकतील. तेथून ते धुपखेड्यास जाऊन मग शिरडींत गले असतील.

भिवंडीजवळील निजामपुरच्या दर्ग्यांतील एक अवलीया ( वय किंवा शक दिलेला नाहीं) सखाराममहाराजांस भेटण्याकरिता कवाडास गेले होते व त्यांना सखाराममहाराज आपले बंधु असें म्हणाले ही कवाडगावीं झालेल्या सखाराममहाराज व त्यांच्या गुरुबंधूच्या एकाच भेटीची माहिती चरित्रकारांनीं दिली आहें. बाबा व सखाराममहाराज या वेळीं सम-कालीन असल्यामुळें हे अवलिया बाबा असण्याचा, कवाड मठाजवळ असलेल्या पोवईच्या विहिरीवरील आंब्याच्या बागेंत सखाराममहाराजांबरोबर योगाभ्यास करण्याचा, रघुनाथभट्टजी यांजकडून योगाभ्यासांतील अडचणी समजून घेण्याचा व त्या बागेंत आंब्यांची झाडें हातांनीं लावण्याच्या कामीं सखाराममहाराजांस मदत करण्याचा बराच संभव आहे. बाबा शिरडींत आले व सखाराममहाराजांना अवलिया भेटले, यादरम्यानच्या काळांत ५--७ वर्षांचें तरी अंतर आहे. बाबा शिरडींत आल्यावर सखाराममहाराज ९ वर्षे हयात होते. बाबा शिरडींत प्रथम येऊन वर्षा--दोन वर्षांच्या आंत गुप्त होऊन पुन्हा प्रगट झाले असें दाभोळकर कृत श्रीसाईसच्चरितांत

ऊर्फ नाना ढवळे, श्री. बाबुराव काळेले व श्री. बळवंतराव किरकिरे यांसह श्रीक्षेत्र कवाड येथें सकाळीं सुमारें ११ वाजतां गेलों. वाटेंत तीन भारद्वाज पक्षी, श्री कामोडी सरित्, श्री पोवई विहीर व विहिरीजवळील चार आंब्यांचीं झाडें,एक जांभळीचा वृक्ष व एक अश्वत्थ वृक्ष या षट् तरुवरांचें पुण्यदर्शन झालें.

कल्याणपासून भिवंडी ६ मैल आहे व तेथून कवाड क्षेत्र ४ मैल आहे. राजरस्ता आहे. कल्याणपासून अजमासें ५ मैलांवर पुण्य नदी कामोडी लागते. हिनें भिवंडी व कवाड यांच्या दरम्यान दोन वळणें घेतलीं आहेत. त्यामुळें दुसरें वळण अगदीं कवाड क्षेत्राजवळ म्हणजे कवाडच्या श्रीसखाराम-महाराजांच्या मठापासून अवघ्या अर्ध्या मैलाच्या आंतच आलें आहे. तसेंच हें वळण, भिवंडीच्या ज्या मोठ्या दर्ग्यांतून एक अवलीया सखाराममहाराजांस शके १७७४ च्या सुमारास याच नदीवर भेटण्यास आले होते, व त्यांना सखाराममहाराजांनीं "आमचे बंधु" म्हणून संबोधिलें होतें, त्या दर्ग्या-पासून ही अर्ध्या मैलाच्या अंतरावर आहे.

असलेल्या पोवई विहिरीजवळ आंब्यांचीं झाडें लावणें संभवनीय आहे.

आतां राहिला प्रश्न बाबांच्या शिर्डीतील गुरुरायांच्या समाधीचा. बाबांच्या गुरुरायांची समाधी जर शिर्डीत आहे, व श्री. रघुनाथभट्टजी मोघे याची समाधि व मठ जर नाशकांत आहे, तर श्री. रघुनाथभट्टजी हे बाबांचे गुरु कसे होतील ?

एका व्यक्तीस अगर भक्तास नेहमी एकच गुरु असतात. असें नाहीं. विषयपरत्वें व संस्कारपरत्वें निरनिराळे गुरु मानले जातात, श्रीदत्तगुरुंनी २४ गुरु मानिले होते हें सुप्रसिद्ध आहे व सखाराममहारा-जांच्या गुरुपरंपरेकडे लक्ष दिल्यास त्यांनाही ८ गुरु होते असें दिसतें. तद्वत बाबांनीं ही निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करण्याकरितां श्री.रघु-

नाथभट्टजी व दुसरे एखादे गुरुराय असे दोन गुरु मानले असल्यास त्यांच्या समाधि नाशिक व शिरडी येथें असूं शकतील.

शिवाय सखाराममहाराजांसारख्या किंवा बाबांसारख्या चेल्यांना गुरूपासून गुरुत्व घेण्यास काल तो किती लागणार ?

"जें गुरु शिष्याची गोठी । पद पिंडाची गाठी" ॥

श्री. ज्ञा. अ. ३, ओं. २७२, श्लो. ४३.

किंवा

"काना वचनाचिये भेटी । सरसाची पै किरिटी ।
वस्तु होऊनि उठी । कवणी एकु जो" ॥ ९८९

श्री. ज्ञा. अ. १८, श्लो. ५०

या श्रीसमर्थ भगवान ज्ञानेश्वर माउलींच्या उक्तीप्रमाणें गुरूंच्या मुखांची व चेल्यांच्या कानाची भेट झाली कीं कार्यभाग झाला. या न्यायानें बाबा व सखाराममहाराज एकाच श्री. रघुनाथभट्टजीजवळ पढत असणें संभवनीय आहे.

सखाराममहाराज याच वळणावर दररोज सायंकाळीं संध्येकरितां येत असत. यावरून सखाराममहाराजांची व या अवलीयांची या वळणावर या मठाच्या जागेवर (त्या वेळीं येथें मठ मुळींच नव्हता.) वारंवार भेट होण्याचा व मठाच्या जागेंत आंब्याचीं झाडें लावण्याचा पुष्कळच संभव आहे.

पण पोवई विहिरीवरील चार आंब्यांच्या झाडांखेरीज मठाच्या जागेंत आंब्यांचीं झाडें आहेत का ? व असल्यास तीं कलमी आंब्यांची आहेत का ? लिहिण्यास अत्यानंद वाटतो कीं, मठाच्या जागेंत मठाच्या भिंतीच्या वळचणीस लागून दोन आंब्यांचीं झाडें आहेत. तीं सखाराममहाराजांनी स्वहस्तानें लाविलीं आहेत. त्यांपैकी एक कावजी पाटील कलमी आंब्याचें आहे व दुसरें पायरीचें आहे.

शुभशकुनाचें फल म्हणा, संतसमाधिदर्शनफल म्हणा, किंवा माझें सुदैव म्हणा, त्या वेळीं समाधीचे वृद्ध पूजारी व व्यवस्थापक श्री. वे. मू. रा. लक्ष्मणशास्त्री लेले वरील मठांतील आंब्यांच्या झाडाची, मठाची, व पोवई विहिरीवरील आंब्यांच्या व जांभळीच्या झाडांची, घांगुरडे कुटुंबाची व इतर सुंदर व महत्त्वाची माहिती मला देण्यास हजर होते. ते म्हणाले—

सखाराममहाराज कवाडास प्रथम शके १७४६ सालीं आले; ते श्री. गदाधरभट दाजी घांगुरडे अग्निहोत्री यांच्या घरीं एका खोलींत राहिले. त्या वेळीं हल्लीं अस्तित्वांत असलेला मठ व धर्मशाळा बांधलेली नव्हती. ती जागा ओसाड पडलेली होती. घांगुरडे कुटुंबापैकीं हल्लीं कोणीही शिल्लक नाहीं. मी गदाधरभटजींच्या नातीचा मुलगा आहें. मी येथें राहत नाहीं. मी हल्लीं वज्रेश्वरीस राहतों. माझे धाकटे बंधु विनायकशास्त्री येथें राहतात. पण मी आजारी असल्यामुळें तूर्त येथें आलों आहें. घांगुरडे मंडळीकडून मीं महाराजांसंबंधानें ऐकलेली हकीकत तुम्हास सांगतों. मी लहानपणापासून येथेंच असतों. येथून एक मैलावर असलेलें अनगांव नांवच्या गांवचा मी राहणारा आहें.

गदाधरभटशास्त्री घांगुरडे

आत्मारामशास्त्री — जिष्णुशास्त्री (लग्न केलें नाहीं.)

आत्मारामशास्त्री: फक्त मुलगी.

फक्त मुलगी: लक्ष्मणशास्त्री लेले. — विनायकशास्त्री लेले.

लक्ष्मणशास्त्री लेले: वय वर्षे ६२–६३.

त्याप्रमाणें घांगुरडे-कुटुंबाचा व माझा संबंध आहे. नंतर लक्ष्मण-शास्त्री पुढें म्हणाले कीं, महाराज जरी घांगुरडें यांच्या घरीं खोलींत राहत, तरी ते फक्त मधुकरीपुरतेच गांवांत येत व बाकीचा सर्व वेळ पोवई विहिरी-वरील करवंदीच्या जाळींत किंवा कामांडी नदीवर घालवीत.

पोवई विहिरीजवळ महाराजांनीं ७–८ रायवळ आंब्यांचीं झाडें, एक जांभळीचें व एक पिंपळाचें अशी ९–१० झाडें लाविलीं होतीं. त्यासच आंब्याची बाग म्हणतात. या झाडांपैकीं हल्लीं चार आंब्यांचीं, एक जांभळीचें व एक अश्वत्थाचें अशी ६ च झाडें शिल्लक आहेत. हीं झाडें कर्वे व बापट यांच्या जमिनींत आहेत. याचीं फळें वाटसरू खातात.

महाराज घांगुरडे यांच्या घरीं आल्यावर त्या घराच्या खोलीस लागून असलेल्या ओसाड जागेंत जेथें हल्लीं कावजी पाटील हापूसच्या आंब्याचें एक व पायरीच्या आंब्याचें एक अशीं दोन झाडें आहेत, त्या जागीं दर-रोज स्नान करीत असत.

महाराज समाधिकाला पूर्वीं १४–१५ वर्षेंच म्हणजे शके १७७७–७५ च्या सुमारापासून संत या नात्यानें विशेष प्रसिद्धीस आले. तोंपर्यंत बाहेरगांवीं त्यांचा फारसा बोलबाला नव्हता व त्यांजकडे फारसे कोणी येतही नव्हते. प्रसिद्धीस आल्यावर मुंबईचे भाटे वगैरे श्रीमान मंडळी त्यांच्या दर्शनास येत व येतांना हापूस-पायरीच्या आंब्यांच्या करंडया आणीत. त्यांपैकीं दोन बाठे ( कोया ) महा-राजांनीं आपल्या हातांनीं स्नानाच्या जागेवर लावले. त्या झाडांना पुष्कळ वर्षां-पासून फळें येऊं लागलीं आहेत. हापूसच्या आंब्यास ७५–८० फळें येतात व हें फळ नारळापेक्षांही मोठें आहे! पायरीच्या आंब्यास १००–१२५ फळें येतात. पण हें फळ हापूसपेक्षां किंचित् लहान आहे. ह्या झाडांस दरसाल फळें येतात. कधीं फळ आलें नाहीं, असें आजपर्यंत केव्हांही झालें

नाहीं. हीं फळें प्रसाद म्हणून ओळखीच्या ठिकाणीं दिलीं किंवा पाठविलीं जातात. यांची विक्री केव्हांही होत नाहीं.

यावरून कवाडकर सखाराममहाराजांच्या मठांत हापूसच्या कलमी आंब्यांचीं झाडें महाराजांनीं हातांनीं लाविलेलीं आहेत हें निःसंशय प्रत्यक्ष पुराव्यावरून सिद्ध झालें. मीं हीं झाडें प्रत्यक्ष पाहिलीं आहेत.

कै. भक्तवर्य बापूसाहेब जोग यांनीं पेन्शन सन १९११ सालच्या सुमारास घेतलें. त्यापूर्वी ते दोन वर्षे म्हणजे १९०९ सालापासून ( फर्लो रजेवर) सेवानिवृत्तीच्या पूर्वीच्या कर्मनिवृत्तीवर होते. ठाणें जिल्ह्यांत भिवंडी, वाडे वगैरे ठिकाणीं नोकरीच्या शेवटीं शेवटीं नोकरीवर असतांना कवाड येथें ते कांहीं दिवस राहिले होते, व पेन्शन घेतल्यावर कवाड येथें कायम राहण्याचा त्यांचा विचार होता. कवाड संस्थानाकडे त्यांचें चांगलेंच लक्ष होतें. बापूसाहेबांनीं कवाड समाधि मठाजवळील धर्मशाळेजवळ स्वत: राहण्याकरितां तेथें एक लहानसें घरही घेतलें होतें. तें घर त्यांनीं ते शिरडीस राहिल्यानंतर कवाड मठास अर्पण केलें. मठाजवळील धर्मशाळा व मठापुढील नगारखाना ह्या इमारती त्यांच्याच खटपटीनें झाल्या. यावरून बापूसाहेब शिरडीस कायमचे राहावयास येण्यापूर्वी कवाडास बरींच वर्षे राहत होते. ते १९०९ सालीं शिरडीस कायमचे राहावयास गेले. पण त्यापूर्वी ते शिरडीस जाऊन-येऊन असत. त्यांच्या कुटुंबाच्या कनिष्ठ भगिनी सौ. दुर्गाताई यांच्या संसारस्थितीसंबंधानें विचारण्याकरितां बापूसाहेब प्रथम बाबांकडे शिरडीस गेले. त्यानंतर ते तिकडे जाऊन-येऊन असत.

एके खेपेस बापूसाहेबांच्या बरोबर भिवंडीचे राहणारे श्री. बापू वैद्य हेही शिरडीस गेले होते. अर्थात् ही गोष्ट सन १९०९ सालापूर्वी २–३ सालांतली असली पाहिजे. त्या वेळीं बापूसाहेब कवाड येथें होते व बापू वैद्यही कवाडास आले होते. मठांतील हापूसच्या आंब्याच्या झाडावर आंब्यांचीं फळें मोठीं झालीं होतीं, पण अगदीं कच्चीं होतीं. बापू वैद्य यांना

हापूसच्या झाडावरील दोन मोठ्या आंब्यांचा एक घड काढला लक्ष्मणशास्त्री लेले तेथेंच होते. ते जरा रागावले व म्हणाले, "अरे, आंबे जरी मोठे दिसतात, तरी ते हिरवे व अगदीं कच्चे आहेत. त्यांत बाठ (कोय, बी) ही झाले नाहींत. असे आंबे तूं कशाकरतां तोडलेस? पिकल्यावर घेतले असतेस, तर हरकत नव्हती." वैद्य म्हणाले, "मीं ते बाबांकडे शिरडीस नेण्याकरितां तोडले आहेत." लक्ष्मणशास्त्री म्हणाले, "अरे, पिकल्यावर मी तुला दिले असते." वैद्य म्हणाले, "मी आतां शिरडीस जात आहें, म्हणून मी ते घेतले आहेत." हे कच्चे आंबे बाबांना देण्याचें वैद्यांचें कृत्य बापूसाहेबांनाही पसंत पडलें नाहीं. तरी पण वैद्य तो दोन आंब्यांचा घड घेऊन शिरडीस गेले. परंतु बापूसाहेबांनीं बाबांच्या पुढें ठेवण्याकरतां वाटेंत चांगले पिकलेले हापूसचे आंबे विकत घेतले. वैद्य व बापूसाहेब शिरिडीस गेल्यावर बापूसाहेबांनीं बाबांच्या पुढें तो कच्च्या आंब्यांचा घड न ठेवतां पिकलेले विकत घेतलेले आंबे ठेविले. बाबांनीं ते पलीकडे सारून दिले व तिकडून आणलेले ते माझे दोन आंबे मला दे असें बाबा बापूसाहेबांना म्हणाले. बापूसाहेब म्हणाले, "बाबा,ते आंबे अगदी कच्चे आहेत.बाबा म्हणाले,"असू देत;" पण तेच मला दे." बाबांनीं असा आग्रह धरल्यामुळें बापूसाहेबांनीं तो हिरव्या दोन आंब्यांचा घड बिऱ्हाडांतून आणून बाबांच्या पुढें ठेवला. तो घड बाबांनीं हातांत घेतला व तो उंच धरून बाबा त्यांच्याकडे सारखे टक लावून घटकाभर पाहत राहिले;त्या वेळीं त्यांच्या नेत्रांतून सारख्या अश्रुधारा गळत होत्या. ( आनंदाश्रु गळत होते ) नंतर बापूसाहेबांना बाबा म्हणाले, "काय रे बापूसाहेबा, हे आंबे कच्चे आहेत काय?" बापूसाहेब म्हणाले, "होय बाबा;त्यांत अजून बाठा सुद्धा झाल्या नाहींत." बाबा पुन्हा म्हणाले, "काय? हे आंबे कच्चे आहेत?" बापूसाहेब म्हणाले, "होय." बाबा म्हणाले, "बरें तर,हे फोड व यांची एकेक फोड सर्वांना दे." बापूसाहेबांनीं ते दोन्ही आंबे फोडले व त्यांची एकेक फोड सर्वांना दिली. ती सर्वांनीं खाल्ली. ती सर्वांना अगदीं उत्तम पिकलेल्या आंब्याप्रमाणें गोड व मधुर

लागली. बाबा म्हणाले, "काय रे, आंबा हिरवा आहे का?" सर्व मंडळी म्हणाली, "बाबा, आंबा अगदीं पिकलेला आहे व फार गोड व स्वादिष्ट आहे." बाबा म्हणाले, "काय रे बापूसाहेबा, हे हिरवेकच्चे आंबे म्हणून तूं मला देत नव्हतास ना? मग हे कच्चे कुठें आहेत!" पिकलेल्या आंब्यासारखी गोड लागल्यावर बापूसाहेब तरी पुढें काय उत्तर देणार?

ही अद्भुत हकीकत व अतर्क्य लीला बापूसाहेबांनीं ते शिर्डीहून कवाडास परत आल्यावर लक्ष्मणशास्त्री यांना सांगितली. तव्हां शास्त्री-बोवांनाही बाबांच्या सर्वव्यापकतेचें, सर्वसाक्षित्वाचे, सर्वज्ञतेचें व कर्तुमकर्तुं अन्यथाकर्तुम् शक्तीचें विलक्षण कुतूहल वाटलें.

तेव्हांपासून बापूसाहेब कवाडाहून शिरडीस जेव्हां जेव्हां आंब्यांच्या मोसमांत जात, तेव्हां तेव्हां बाबांच्याकरितां लक्ष्मणशास्त्री त्यांना सखाराम-महाराजांनीं मठांत लाविलेल्या हापूस-पायरी आंब्यांचीं पिकलेलीं फळें मुद्दाम काढून देत व बापूसाहेबही मोठ्या प्रेमानें उत्कंठेनें, आतुरतेनें व भक्तीनें ती बाबांच्याकडे घेऊन जात.

यावरून सखाराम महाराजांनीं स्वहस्तें मठांत लाविलेल्या कलमी आंब्यांचीं फळें बापूसाहेबांच्या बरोबर कवाडाहून शिरडीस बाबांच्याकडे सन १९०६--७ सालापासून सन १९०९ सालापर्यंत म्हणजे बापूसाहेब शिरडीस कायमचे राहावयास जाईपर्यंत बहुतेधा दरवर्षी जात असत, हें निर्विवाद उघड दिसतें.

तसेंच सन १९०९ सालीं श्रीमती काशीबाई कानिटकर ह्यांना ह्याच मठांतील कलमी आंब्यांचीं दोन फळें देण्याकरतां बाबांनीं कोपर-गांवच्या श्रीदत्तमंदिरांतील ब्रह्मचारीबोवाजवळ पाठविणें अगदी संभवनीय नव्हे शक्य आहे. बापूसाहेबांनीं या वर्षीं आणिलेल्या फळांपैकींच ही दोन फळें असलीं पाहिजेत, हें खास व निश्चित.

आतां फक्त बाबा व सखाराममहाराज हे गुरुबंधु कसे व हीं झाडें लावतेवेळी बाबा सखाराममहाराजांबरोबर होते किंवा कसें ? याचीं दोन उत्तरें देतां येतील. पहिलें चरित्रावलोकनावरून व दुसरें बाबांच्या व्यापक व गूढार्थ शब्दावरून.

चरित्रावलोकनावरून व श्रीलक्ष्मण शास्त्री यांच्या सांगण्यावरून शक १७७४ च्या सुमारास बाबा लौकिक दृष्ट्या १४ वर्षांचे होते. त्याच शकाच्या सुमारास निजामपुरच्या दर्ग्यांतील अवलीयाची व सखाराममहाराजांची नेहमीं भेट होत असे. ही भेट हल्लीं अस्तित्वांत असलेल्या मठाच्या आवारांत म्हणजे त्या वेळीं घांगुरडे यांनीं सखाराममहाराजांस राहण्याकरतां दिलेल्या त्यांच्या घराच्या खोलीजवळील खुल्या आवारांत किंवा पोपई विहिरीजवळील आंब्याच्या बागेंत किंवा श्री. कामोडी नदीकांठीं होत होती. ही उभयतां गुरुबंधूंची जोडी त्या ठिकाणीं योगाभ्यास करीत असे. त्या वेळीं कधीं कधीं योगाभ्यासांतील अडचणी दूर करण्याकरतां त्या ठिकाणीं श्री. रघुनाथभट्टजी मोघे गुप्तरूपानें येत असले पाहिजेत. इतक्या गोष्टी अगदीं संभवनीय नव्हे सत्य दिसतात, व त्या तशा मानल्या म्हणजे बाबा सखाराममहाराजांचे गुरुबंधु होते. ते एकाच गुरूजवळ पढत होते, त्यांनीं उभयतांनीं गुरूंच्या मठांत ( हल्लीं जो मठ आहे त्या मठांत ) हातांनीं कलमी आंब्यांचीं झाडें लाविलीं व त्या झाडांच्या फळांपैकींच दोन आंबे बाबांनीं श्रीमती काशीबाई कानिटकर यांना देण्याकरतां कोपरगांवच्या दत्तमंदिरांत पाठविले व तेथील ब्रह्मचारी-बोवानीं ते दुसऱ्या दिवशीं काशीबाई शिरडीहून तेथें परत आल्यावेळीं त्यांना दिले, अशी संगती लागते.

मला आपला वियोग होऊं नये अशी सखाराममहाराजांनीं जेव्हां तारापुरास श्री. बरवे यांचे घरीं गुप्तरूपानें आलेल्या श्री. रघुनाथ भटजीस प्रार्थना केली, तेव्हां श्रीसद्गुरु रघुनाथ भट्टजी यांना म्हणाले कीं तुमचा व

आमचा वियोग होता कधीं ! तो कधींच नव्हता, आताही नाही आणि पुढेंही होणार नाही.असें म्हणून ते अंतर्धान पावले. यावरून हल्लींच्या मठांत सखाराममहाराजांच्या व बाबांच्या गुरुराणांचें वास्तव्य आहे व याच मठांत सखाराममहाराजांनी हापूस-पायरीची झाडें लाविली आहेत. म्हणजे गुरूंच्या मठांत सखाराममहाराज व बाबा यांनीं आपल्या हातांनीं आंब्यांचीं झाडें लाविलीं, ही गोष्ट सत्य दिसते.

आतां दुसरें उत्तर असें कीं सर्व व्यापक, सर्वसाक्षी सर्वज्ञ बाबा काय व कोण नाहींत ? कधीं कधीं ते इतर संतांना आपले बंधु, गुरुबंधु, दादा, काका, मामा असेंही म्हणत, व कधीं कधीं ते संत म्हणजे मीच आहें असें सांगून प्रत्यक्ष खात्री पटवून देत.

कै. भक्तश्रेष्ठ बापूसाहेब जोग यांना बाबांनी सन १९०९ सालीं सांगितलें की, तूं आतां येथेंच राहा. कचाडास जाऊं नकोस व येथें माझी नौकरी कर. बापूसाहेब म्हणाले, मी हल्लीं सेवानिवृत्तिपूर्व रजेवर ( फर्लो रजेवर ) आहे, मला नोकरींत बढती मिळत आहे कीं, तरी मला जाऊं द्या. शिवाय तुम्ही माझे गुरू नाहींत माझे गुरु मुरुडकर पाटणकरबुवा आहेत. यांचें दर्शन तुम्ही मला येथें करून देत असाल तर मी येथें राहतों. नाही तर मी कचाडास जातों. बाबा म्हणाले, " बरें, तुला तुझ्या गुरूचें दर्शन येथेंच होईल. तूं येथेंच राहा. " असें म्हणून बाबांनी दुसऱ्या दिवशीं बापूसाहेबांस त्यांच्या गुरूचें दर्शन तेथेंच दिलें. नंतर बापूसाहेबांनीं कचाडास जाण्याचा नाद सोडून देऊन ते कायमचेच शिरडीस राहिले.

नांदेडचे प्रसिद्ध धनाढ्य शेट श्री.रतनजी वाडी यांनी ते प्रथम शिर्डीस येण्याच्या आदल्या दिवशीं नांदेड येथें गुहरूपें वास्तव्य करीत असलेले संत श्रीमौलीसाहेब हमाल यांना एक छोटा खाना दिला. त्या खान्यांत खर्च ३-१४-० झाला होता. पण ही गोष्ट रतनसी शेटच्या लक्षांत नव्हती.

रतनसी शेट जेव्हां शिरडीस आले, व बाबांच्या दर्शनास गेले व त्यांना दक्षिणा देऊं लागले, तेव्हां बाबा त्यांना म्हणाले कीं, तूं जी मला दक्षिणा देशील त्यांतील ३-१४-० वजा करून बाकीचे पैसे मला दे. हे तुझे ३-१४-० मला पूर्वींच मिळाले आहेत. यावरून मोलीसाहेब व मी एकच. त्यांना दिलेला खाना तो मलाच पोंचला, असें बाबांनीं ध्वनित केलें. ( श्रीसाईसच्चरित पाहा ) अ. १४

त्याचप्रमाणें मुंबापुरीचे श्री हरिश्चंद्र पितळे हे बाबांच्या दर्शनास गेले असतां बाबांनीं त्यांना रु. ३ दिले व सांगितलें कीं, बापू, तुला मीं पूर्वीं रु. २ दिले आहेत. त्यांतच हे तीन रुपये ठेव व याची पूजा करीत जा. पितळे हे प्रथमच बाबांच्या दर्शनास आलेले. तेव्हां त्यांना बाबांनीं पूर्वीं दोन रुपये दिले, या म्हणण्याचा अर्थ कळेना. ते घरीं आल्यावर त्यांच्या वृद्ध मातुःश्रींनीं त्यांना शिरडीची हकीकत विचारली. त्यांनीं ही दोन रुपयांची हकीकत सांगितली. तेव्हां त्यांच्या मातुःश्री म्हणाल्या कीं, बाबा बोलले ती हकीकत खरी आहे. पूर्वीं तुमचे वडील अक्कलकोटला श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनास गेले होते. तेव्हां स्वामीमहाराजांनी त्यांना दोन रुपये देऊन हे पूजेंत ठेऊन त्याची पूजा करीत जा असें सांगितलें. त्याप्रमाणें ते २ रु. देवांत ठेवून त्यांची पूजा होत असे. पुढें कांहीं वर्षांनीं कोणी देवांची पूजाच करीनाशी झाली व ते दिलेले दोन रुपये मुलांची खेळणीं होऊन इकडे तिकडे खर्चण्यांत गेले. ( श्रीसाइसच्चरित अ. २६ )

या तीन्ही वरील अनुभवांवरून बाबांची व्याप्ति अखिल ब्रह्मांडांत आहे. यच्चावत् प्राणिमात्राशी ते एकरूप आहेत. बापूसाहेबांचे गुरु धुरंडचे पालणकरबुवा ते मीच, नांदेडचे मोलीसाहेब ते मीच, त्यांना दिलेला खाना तो मलाच मिळाला. अक्कलकोटचे स्वामीमहाराज म्हणजे मीच. त्यांनीं दिलेले दोन रुपये ते मींच दिले. याप्रमाणें त्या त्या भक्तांना ते ते अनुभव बाबांनीं पटवून दिले.

आतां याच न्यायानें विचार केला म्हणजे सखाराममहाराज व बाब हेही एकच. सखाराममहाराजांचे गुरु तेच बाबांचे गुरु. सखाराममहाराज ज्यांच्याजवळ पढले, त्याच गुरुरायाजवळ बाबा पढले. माझा वियोग तुम च्याशीं पूर्वी नव्हता, आतां नाहीं व पुढेंही नसणार, असें श्रीरघुनाथ भट्टजींनीं सखाराममहाराजांस सांगितलें. अर्थात् सखाराममहाराजांच्या मठांत त्यांच्या गुरुरायाच वास्तव्य आहे. म्हणजे सखाराममहाराजांचा मठ तोच त्यांच्या गुरुरायांचा मठ व या मठांत सखाराममहाराजांनीं आंब्यांचीं झाडे लाविलीं, म्हणजे गुरूंच्या मठांत बाबांनीं व सखाराममहाराजांनीं आपल्या हातांनीं कलमी आंब्यांचीं झाडें लाविलीं, व याच झाडांचीं दोन फळे बाबांनीं काशीबाई कानिटकर ह्यांना देण्याकरितां कोपरगांवच्या दत्तमंदिरां तील ब्रह्मचारीबोवांकडे पाठविलीं व ब्रह्मचारीबुवांनी तीं त्यांना दुसऱ्या दिवशीं दिलीं. याप्रमाणें बाबांच्या बोलण्याची अशी सुंदर संगति लागते. वर उद्धृत केलेल्या प्रश्नाचें उत्तर यापेक्षां दुसरें मला दिसत नाहीं.

आतां बाबा शिर्डीस आल्यावर कांहीं महिने त्यांनीं श्रीद्वारका माईत वास केला व नंतर ते तेथून निघून श्री. नवलकरसाहेबांच्या वाड्यांतील निंब वृक्षाखालीं राहिले. येथें कां राहतां म्हणून विचारतां, येथें माझ्या गुरुरायांची समाधि आहे असें म्हणून बाबांनीं ती जागा उकरण्यास सांगून सवापुरुष खालीं असलेली समाधि सर्वांना प्रत्यक्ष दाखविली व नंतर बाबांच्या आज्ञेवरून गांवकऱ्यांनीं लागलीच ती जागा बुजवून जशीच्या तशी करून टाकली. तेथें दर गुरुवारीं व शुक्रवारीं धूप जाळण्यास बाबांनीं जमलेल्या मंडळीस आज्ञा केली.

आतां हे बाबांचे गुरुराय हिंदु का मुसलमान व बाबांना ही समाधि कशी कळली ?

पहिल्या प्रश्नाचें उत्तर ते हिंदुही असतील किंवा मुसलमानही असतील. रावबहादुर लिहितात की, बाबांनी गुरुरायांच्या समाधीजवळ जाळण्यास ज्या अर्थी ऊद मागितला व ऊद हा शब्द ज्या अर्थी आरेबिक पार्शी किंवा ऊर्दु आहे, त्या अर्थी बाबांचे गुरुराय मुसलमान असावे. पण एवढ्यावरूनच ते मुसलमान असावे हे अनुमान काढणें बरोबर होणार नाही. कारण बाबांच्या मुखांतून कोणता शब्द निघाला, त्याची त्याच वेळी नोंद करून कोणीही ठेविली नाही किंवा पूर्ण आठवणही ठेवलेली नाही. तो शब्द ऊदही असेल, धूपही असेल किंवा लोबानही असेल. नेहमीच्या अनुभवाप्रमाणें बाबांची नेहमी मराठी भाषा वापरून हिंदूंना साजेल अशीच कामें करण्याकडे ( राम, लक्ष्मण, सीतामाईच्या मूर्ति खरेदी करणें, रामनवमीचा उत्सव सुरू करणें, हिंदूकडेच भिक्षेस जाणें, मशिदीस द्वारकामाई म्हणणें, हिंदूंकडून आपल्यास गंध लावून घेऊन आपली पूजा व आरति करून घेणें वगैरे वगैरे ) नेहमीं प्रवृत्ति असे. धूप शब्द उच्चारला असेल, तर तो शब्द हिंदूही वापरतात व मुसलमानही वापरतात. पण धूप हा शब्द मुळचा शुद्ध संस्कृत आहे व देवाजवळ सकाळ-संध्याकाळ पूजेच्या वेळी धूप ( आतां अलीकडे ऊदबत्ती, अगरबत्ती ) जाळण्याची चाल आमच्या हिंदु लोकांत पुरातन कालापासून आहे.

> " वनस्पतिरसोद्भूतो गंधाढ्यो गंधोत्तमः । आघ्रेयः सर्व देवांना धूपोऽयं प्रतिगृह्यताम् ॥"

हा पूजेंतील धूपाचा मंत्र सर्व विश्रुत आहे. करितां, बाबांनी धूप शब्द वापरला असल्यास म्हणजे धूप जाळण्याची आज्ञा केली असल्यास बाबांचे गुरुराय हिंदूच म्हणावे लागतील.

बरें, बाबांनीं लोबान जाळण्याची आज्ञा केली असल्यास माझ्या मतें लोबान हा शब्द संस्कृत "लोभन" ( =आकर्षण=Enticement किंवा allurement किंवा incentive या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे.

देवाचें प्रत्येक इंद्रिय आपल्याकडे आकर्षण करून घेण्याकरितां त्या त्या इंद्रियांना प्रिय असे विषय ( पदार्थ ) पूजेच्या वेळीं त्यांना देऊन त्या त्या इंद्रियांची तृप्ति करून देवकृपा संपादन करावयाची. करितां हा शब्द उच्चारला असल्यासही बाबांचे गुरु हिंदुच ठरतात.

शिवाय गुरु हिंदु, चेला हिंदु, गुरु मुसलमान, चेला मुसलमान, किंवा गुरु हिंदु चेला मुसलमान अथवा गुरु मुसलमान चेला हिंदु यांपैकीं कांहींही असूं शकतें.

परंतु माझ्या मतें केवळ ऊद किंवा धूप जाळण्याच्या आज्ञेवर बाबांच्या गुरुरायांच्या हिंदुत्वाचा किंवा यवनत्वाचा निर्णय होऊं शकणार नाहीं. त्यास वरील विधानाशिवाय आणखी दुसरीं विशेष महत्त्वाचीं साधक-बाधक कारणें पाहिजेत, असें मला वाटतें.

आतां बाबांना त्यांच्या गुरुरायांची समाधि भूपृष्ठापासून सवा पुरुष खालीं खोल असलेली कळली कशी ? याचें एकच उत्तर " अंतर्ज्ञानानें " किंवा दुसऱ्या कोणाच्या मुखांतून कळलें असेल तर. परंतु दुसऱ्यापेक्षां पहिलेंच उत्तर समर्पक दिसतें. दुसऱ्या उत्तरांत शंकेस जागा पुष्कळ आहेत.

असो. आजच्या लेखाचा मुख्य विषय हा नाहीं. रावबहादुरांनीं पत्रांत याचा उल्लेख केला आहे. म्हणून त्यासंबंधानें दोन शब्द लिहिले.

मुख्य विषयाची वर चर्चा केली आहे, त्याचें रावबहादुर बांबर्डेकर यांनीं व माझ्या इतर जिज्ञासु साइभक्त मित्रमंडळींनीं मनन करून विचार करावा, अशी त्यांना माझी सविनय प्रार्थना आहे.

आपण पाठविलेल्या रावबहादुरांच्या पत्रास उत्तर देण्याचें फार लांबणीवर पडलें म्हणून चरित्रें वाचून व कवाडास जाऊन मुख्य विषया-

संबंधाने मिळालेली माहिती व त्यावर सुचलेले विचार आपणाकडे पाठवीत आहे.

रावबहादुर यांच्या पत्रांत रज:संपर्क दोषाबद्दल लिहिलें आहे तें माझ्या मतें अगदीं यथार्थ आहे. ऋषिपंचमीची कथा मीं वाचली आहे व दरसाल ऋषिपंचमीच्या दिवशीं वाचतोंही. त्यांत धार्मिक दृष्टीनें रज:संपर्क दोषाचे अनिष्ट परिणाम व त्यावर उपाययोजना सांगितली आहे. आपलें धर्मशास्त्र वैद्यशास्त्रास धरून आहे इतकेंच नव्हे, तर त्यांत ऐहिक व पारत्रिक सुखाचा विचार केला आहे. निदान रज:संपर्क हा रोगजनक आहे अतएव तो घरांत न कळवतां रज:स्वला स्त्रीनें तीन दिवस विटाळशी म्हणजे दूर म्हणजे segregation मध्यें बसावें हा जो शास्त्रकारांनीं मानवजातीच्या शरीरस्वास्थ्याकरितां निष्कर्ष काढिला आहे, तो खरोखरीच मननीय व आचरणीय आहे.

श्रीसखाराममहाराज यांच्या चरित्रांत या रज:संपर्कदोषाबद्दल खालीलप्रमाणें हकीकत लिहिली आहे

एके दिवशीं दोनप्रहरीं महाराज मधुकरीस गेले असतां त्यांना एका बाईनें मधुकरी आणून घातली. परंतु त्या वेळीं ती बाई नुकतीच अस्पर्श झाली होती. मात्र बाईच्या लक्षांत ती गोष्ट आली नव्हती. महाराजांना ती गोष्ट अंतर्ज्ञानानें कळली. त्यांनीं त्या गोष्टीची वाच्यता न करतां व गांवांत दुसरीकडे कोठेंही भिक्षेस न जातां ते तडक नदीवर गेले व तेथें ती सर्व मधुकरी पाण्यांतील जीवांस खावयास घालून आपण स्नान करून चिन्हाडीं परत आले. त्या दिवशीं महाराजांना उपोषण पडलें. यावरून रज:संपर्क दोष किती अपायकारक आहे हें लक्षांत येईल. परंतु आमची हिंदु उच्चवर्णीय म्हणविणारी मंडळी या गोष्टीचा उपहास करतात, विटाळ मानीत नाहीत किंवा विटाळ न मानण्याकडे त्यांची प्रवृत्ति दिसतें हें आपल्या मायदेशाच्या अध:पाताचें दैवदुर्विपाकाचें चिन्ह होय.

शाकास जाऊन आणखी कांहीं जास्त माहिती मिळते की काय तें पाहणार आहे. माहिती मिळून वरील मुख्य विषयावर प्रकाश पडण्यासारखें असल्यास यथावसर लिहीन.

हें पंचविंशति दलाचें वाक्तामरस स्वतःशिवाय स्वतःच्या अगम्य लीला इतरांस न समगूं देणाऱ्या पण सरभ दयाळू त्या श्रीसमर्थ साईमाउलीच्या पुण्य, पवित्र व दिव्य चरणारविंदीं अनन्य प्रेम व भक्तिभावानें व व अत्यादरानें आज गुरुवारच्या साडेतीन मुहूर्तांतील सुमुहूर्तावर अर्पण करून आपली रजा घेतों.

ठाणें, चैत्र शु० १<br>गुरुवार शके १८५७<br>युवनामसंवत्सरे<br>ता. ४–४–३५

संतचरणरजदासानुदास<br>**बाबांचें बाळ.**

# श्रीसाईमहाराज समर्थ

# श्रीसाईमहाराज शिर्डी येथील संवत १९९०

## सन १९३४, शके १८५६

## श्रीगुरुपूर्णिमेच्या उत्सवाचा जमाखर्च

**जमा रु.**

| | |
|---|---|
| ५९।८। | समर्थांच्या पेटीपैकीं उत्पन्न, |
| ३४२॥≡॥ | वर्गणी भक्तमंडळीकडून आलेली यादी अलग आहे |
| ४०२ | |
| २०६।- | श्रीमंत पूर्णचंद्र भय्यासाहेब यांच्याकडून झडती झालेले त्याजपैकीं |
| ६०८।- | |

**झडती**

| | | |
|---|---|---|
| २३७८।- | मुद्रक खर्च एकंदर | |
| २४॥= | तांदूळ मण | २ |
| ७॥ | तांदुळ ठोकळ | ८१॥ |
| ७८= | तुरीची डाळ | ८१॥ |
| ४॥ | चण्याची डाळ | ८१ |
| १७॥≡ | गहु हावरा मण | ८३ |
| २९॥८॥ | साखऱ्या पोत ११०शेर | |
| ३॥ | रवा लाडवाकरितां ३० | |
| ॥=॥ | सुपारी शेर | ८८३॥ |
| -।८। | लवंग ,, | ८८॥- |
| १८= | खोबरे | ८८३ |
| १ | बदाम | ८८१ |
| ८=॥ | किसमीस | ८८१ |
| ।= | शेंगदाणा | ८८- |
| ८≡ | विलायची | ८- |
| ८= | मोहरी | ८८॥ |
| ।- | साबुदाणा | ८८१ |
| ।= | आमसुल | ८८१ |
| ८-॥ | हिंग तोळे | ८८३ |
| ८-। | गोडजीरे | ८= |
| ८≡॥ | भगर शेर | ८८१ |
| ।- | सरोट | ८८२ |
| ८≡॥ | काथ | ८८२ |
| १३।- | गुळ बह्मारी | ५ |
| १०।- | शाकभाजी | |
| ९॥ | पत्रावळीद्रोण | |
| ४॥ | जवसाचें तेल | |
| ७॥≡॥ | तुप पिपे ३ | |
| १०।-॥ | दूध ( म्हैशींचें ) | |

| जमा. | खर्च |
|---|---|
| रु. आ. पै. | रु. आ. पै. |

१८- गरम मसाला
६॥≡॥ चहा पौंड ५
१॥ केशरतोळे २

२३७८।

१६८= पुजेबद्दल सामान

८। धणे
८- खारीक
८≡॥ नारळ
८≡ खडीसाखर
।- उदबत्ती
।-॥ साखरपिठी
८- कुंकू
४ फुलांचे हार
२॥-॥ अभिषेक-दक्षिणा
१। चिल्लर दक्षिणा
८= गुलाल
८≡ बुक्का
-॥ कापुर
॥= उद
४।- सुवासिक तेल अत्तर वगैरे
८= लाह्या प्रसादाकरितां
।= केशर
॥= तुप शेर ॥-

१६८=

१५६॥-। किरकोळ खर्च

२८।- आचारी स्वयंपाकी
७॥- सर्पण
२६॥≡। मजूरीखर्च सामान तयार
१८॥≡॥ ग्राम भोजन
२ सफाई खर्च
४३।=॥ रेल्वे खर्च टांगा खर्च

| जमा. रु. आ. पै. | खर्च रु. आ. पै. | | |
|---|---|---|---|
| | | ३८- | हमाली खर्च |
| | | १॥- | घोडघास ( गवत ) |
| | | १५ | पापडी समार्धावर |
| | | १५६॥-। | |
| | ५७॥ | | धर्मादाय खर्च |
| | | ५१ | किर्तन बिदागी |
| | | ६॥ | इनाम गोरगरीबांस |
| | | ५७॥ | |
| | ९॥-॥ | | रोषनाई खर्च |
| | | ६॥-॥ | घासलेट पिपे २ |
| | | २॥ | मेंटल बत्ती |
| | | ॥- | मोंबत्ती |
| | | ९॥-॥ | |
| | ५॥।≈ | | प्रसाद खर्च |
| | | ४८- | सुंठ साखर |
| | | ।- | रद्दी |
| | | १॥ | प्रसादाचें लेबल |
| | | ५॥।≈ | |
| | १० | | बँड वाजा |
| | ६॥ | | शिपायांबद्दल कापड |
| | | ३॥। | कापड वार |
| | | २॥। | शिलाई |
| | | ६॥- | |
| | | ॥- | गील |
| | | १॥≈ | लेबल |
| | | १॥ | कवरें |
| | | ४२॥≋। | आमंत्रणपत्रिका |
| | | ३॥ | पत्रिका छपाई |
| | | ८ | कवरे-लेबल लिखाई |
| | | ४८।-॥ | पोस्टेज स्टँप्स |
| | | २॥-। | रसीदा |
| | | ॥ | कमिशन चेक वटविण्याचे |
| | | ६०८।- | |

# श्रीशिरडी येथील श्रीसाईबाबांच्या शके १८५८ च्या श्रीगुरुपौर्णिमेच्या उत्सवासंबंधीं वर्गणीदारांच्या नांवांची यादी

| नांव | | | रु. आ. पै |
|---|---|---|---|
| श्री. | आजरेकर केशव गणेश | बेळगांव | ५–०–० |
| ,, | ,, दत्तात्रय लक्ष्मण | पुणें | ३–०–० |
| ,, | आचार्य बाळाराम विश्वेश्वर | केळवें | १–०–० |
| डॉ. | आजरेकर म. स. | बेळगांव | ५–०–० |
| श्री. | आंजर्लेकर का. रा. | पुणें | १–०–० |
| ,, | अजिंक्य बेनाबाई | मुंबई | १–४–० |
| ,, | अघोर यमुनाबाई | जळगांव | ५–०–० |
| ,, | कदम शंकर कदम | कराची | ०–४–३ |
| ,, | कारंडे भास्कर विष्णु | मुंबई | १–४–० |
| ,, | करंदीकर रामकृष्ण जनार्दन | डहाणू | ५–०–० |
| ,, | ,, हरि कृष्ण | बाळापूर | १–०–० |
| ,, | कंटक शामराव भास्कर | मुंबई | १–४–० |
| ,, | कमिसरियटवाला नादिरशा होर्मसजी | ,, | १–४–० |
| ,, | कामत सखाराम महादेव | अलीबाग | ५–०–० |
| ,, | किन्हीकर गंगूबाई दाणी | जळगांव | १–०–० |
| ,, | कीर्तिकर गणपत आत्माराम | खार | १–४–० |
| ,, | कुडाळकर सदानंद भास्कर | वांद्रे | १–४–० |
| ,, | कुळकर्णी दत्तात्रय महादेव | मालाड | ०–८–३ |
| कु | ,, नलिनीबाई | ठाणें | २–८–० |
| श्री. | कुरतुडकर रामचंद्र श्रीपाद | दादर | १–८–० |
| ,, | केळसकर काशीनाथ भागोजी | ठाणें | १–०–० |
| ,, | केसरकर वामन सांबाशेट | बांद्रें | ५–०–० |
| ,, | केळकर भिकाजी नारायण | दादर | १–४–० |
| | | | रु. ५१–८–६ |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | मागील पानावरून रु. | | ५२–८–६ |
| श्री. | कोठारे गणपतराव मोरेश्वर | मुंबई | १–०–० |
| सौ. | चंपुबाई गणपतराव | ,, | १–०–० |
| श्री. | कोराने माधव गंगाधर | बिलीमोरा | १–४–० |
| ,, | खंडकर ना. रा. | उज्जयनी | ५–०–० |
| ,, | खारकर श्रीधर नारायण | ठाणें | १–०–० |
| ,, | ,, गो. श्रीधर | ,, | १–०–० |
| ,, | ,, गोपाळ श्रीधर | बडोदें | १–०–० |
| ,, | ,, द्वारकानाथ नारायण | जबलपूर | १–०–० |
| ,, | ,, बाळकृष्ण नारायण | चांदोर | १–०–० |
| | खासगीवाले कृष्णाजी काशीनाथ | पुणें | ३–०–० |
| श्री. | गिरधर गणपत त्रिंबक | अंधेरी | १–०–० |
| डॉ. | गवाणकर आर. एन. | वसई | १०–०–० |
| श्री. | गंगाराम भिकाजी | ठाणें | १–४–० |
| सौ. | गावडे मुक्ताबाई | कराची | ०–४–३ |
| श्री. | गाळवणकर यशवंतराव जनार्दन | वांद्रे | २–०–० |
| सौ. | गोरक्षकर लक्षीबाई नारायण | सान्ताक्रुझ | १–४–० |
| ,, | ,, सुशीलाबाइ वसंतराव | ,, | १–४–० |
| ,, | चव्हाण सत्यभामाबाई | कराची | ०–५–३ |
| श्री. | ,, बी. के. | पालघर | ४–०–० |
| ,, | चांदोरकर वासुदेव नारायण | कल्याण | १–०–० |
| ,, | चांवळ म. वि. | ठाणें | १–०–० |
| ,, | जयकर सोनाबाई | वांद्रें | २–०–० |
| ,, | जुन्नरकर यशवंत राजाराम | ,, | २–०–० |
| ,, | जोशी माधवराव एम. | मुंबई | १–४–० |
| | | | रु. ९६–६–० |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | | मागील पानावरून रु. | ९६–६–० |
| श्री. | जोशी मोरेश्वर विष्णु | उंबरगाव | १-०-० |
| ,, | डोळस आनंदराव परशराम | कांदिवली | २–४–० |
| ,, | तन्ना गोवरधन गीरधर | डहाणू | ५–०–० |
| ,, | ,, नरोत्तम ,, | ,, | १–०–० |
| ,, | तळपदे आनंदराव गणपतराव | बांद्रे | १–२–० |
| ,, | ,, सदानंद विनायक | मुंबई | १–०–० |
| ,, | तावडे त्रिंबक नारायण | ,, | १–४–० |
| ,, | तवरिया एफ. पी. | ,, | १–४–० |
| ,, | तार्डावाला दोरावजी धनजीशा | ,, | १–८–० |
| ,, | तोडणकर सीताराम विष्णु | ,, | १०–०–० |
| डॉ. | त्रिवेदी लालुप्रसाद | मेमदाबाद | २–०–० |
| श्री. | दळवी जनार्दन रामचंद्र | वसई | ३–०–० |
| ,, | दातार गोपाळ भास्कर | ठाणें | १–०–० |
| सौ. | ,, सुशीलाबाई गोपाळ | ,, | १–०–० |
| श्री. | दाभोळकर गजानन गोविंद | बांद्रे | १–४–० |
| ,, | ,, जी. आर. | अमदाबाद | २–०–० |
| ,, | दिघे श्रीकृष्ण गोपीनाथ | मुंबई | ५–०–० |
| ,, | देव रामचंद्र सिताराम | अंधेरी | २–०–० |
| ,, | ,, सदाशिव विश्वनाथ | मुळशी | १–०–० |
| ,, | देवधर विनायक अनंत | मुंबई | ५–०–० |
| ,, | देशवंडीकर दुर्गाबाई | कराची | १–०–० |
| सौ. | देसाई कमलाबाई | जळगांव | ०–८–३ |
| श्री. | दामोधर गणपतराव | ,, | २–०–० |
| ,, | देसाई हरिभाऊ महादेव | दादर | ०–४–३ |
| ,, | मेजर दौलतसिंग साहेब | उज्जयनी | ११–०–० |
| कु. | नवलकर बाबलीबाई सुंदरराव | मुंबई | १–०–० |
| | | रु. | १६०–१२–६ |

रु.आ.पै.

मागील पानावरून रु. १६०-१२-६

| | | |
|---|---|---|
| सौ० नवलकर शांताबाई सुंदरराव | मुंबई | १-४-० |
| श्री ,, सुंदरराव दिनानाथ | मुंबई | १-४-० |
| ,, नाचणे शांताराम बळवंत | कुर्ले | १-८-० |
| ,, नुलकर विश्वनाथ लक्ष्मण | पुणें | २-०-० |
| सौ० धुरंधर नवुबाई रामराव | सान्ताक्रुझ | १-४-० |
| कु० सोनाबाई रामराव | ,, | १-४-० |
| श्री० परुळकर दत्तात्रय नारायण | एलिचपूर | ५-०-० |
| ,, परेळकर गजानन मोरेश्वर | मुंबई | ११-०-० |
| ,, पंडित भिकाजी नारायण | तुर्बेच | ५-०-० |
| ,, पाटकर दिनकर मोरेश्वर | चन्हेरी | १-४-० |
| सौ० ,, सुंदराबाई व्ही. | बडोदें | २-०-० |
| श्री० पाटणकर दत्तात्रय नारायण | वांद्रे | १-४-० |
| ,, पारकर यशवंत गुणाजी | बडोदें | १-०-० |
| ,, पितळे दत्तात्रय आनंदराव | मुंबई | १-८-० |
| ,, ,, विष्णु बळवंत | परेल | २-०-० |
| ,, पुरंदरे मधुसूदन अनंतराव | मुंबई | ०-८-० |
| ,, पोतदार घनःश्याम शिवराम | ,, | १-०-० |
| ,, पोरे बाळकृष्ण नारायण | चौल | १-४-० |
| सौ० पै लक्ष्मीबाई | कराची | ०-५-३ |
| श्री० प्रधान के. बाबू. | गोधरा | २-०-० |
| ,, पाठक सरस्वतीबाई गणपतराव | ठाणे | १-०-० |
| मिसेस फणसे पार्वतीबाई शिवराम | अलीबाग | ५-०-० |
| श्री० बाळ दिनकर कृष्ण | मुंबई | १-४-० |
| रा. ब. बांबर्डेकर वासुदेव अनंतप्रभू | ,, | १-४-० |
| श्री० बांद्रेकर केशव बापूशेट | बांद्रे | २-०-० |
| ,, वैद्य के. ए. | कर्जत | २-०-० |

रु. २१६-१३-०

| | | | |
|---|---|---|---|
| | | | रु. आ. पै. |
| | | मागील पानावरून | २१६-१३-० |
| कु० | ब्रम्हांडकर शांताबाई | मुंबई | २--०--० |
| डॉ० | भट छोटालाल भुलाभाई | अहमदाबाद | ६--०--० |
| श्री० | भांगले मेघश्याम बाळकृष्ण | बांद्रे | २--०--० |
| ,, | भांडारे श्रीधर गणेश | सोलापूर | १--१०--० |
| ,, | भिमजी भानजी | मालवण | २--८--० |
| ,, | भरूचा शापुरजी एच. | मुंबई | १--०--० |
| वे. शा. सं. | भेंडकी विष्णु शिवराम | जळगांव | १--०--० |
| श्री | मदन रामराव दिनानाथ | मुंबई | १--४--० |
| ,, | मदनजी भिमजी | मालवण | २--८--० |
| ,, | महाडिक रामचंद्र | कराची | ०--४--३ |
| ,, | महाजन महादेव जिवाजी | मुंबई | ०--२--० |
| ,, | मंत्री पांडुरंग जयराम | ,, | ४--४--० |
| ,, | ,, मानकर बाळकृष्ण माधवराव | बांद्रे | २--०--० |
| ,, | ,, विनायक बाबाजी | मुंबई | १--४--० |
| सौ० | मालवणकर रुक्मिणीबाई | कराची | १--४--० |
| श्री० | मुदलीयर एस्. सी. | पुणें | २--०--० |
| ,, | मुसळे कृष्णाजी मोरेश्वर | धोलवड | २--०--० |
| ,, | मुळे गोविंद अमृतराव | माहीम | १--४--० |
| ,, | मोडक व्ही. जी. | कल्याण | १--४--० |
| ,, | ,, रामचंद्र वामन | पुणें | ५--०--० |
| ,, | म्हात्रे पांडुरंग नारायण | अंधेरी | १--४--० |
| ,, | राव आर. के. | माटुंगा | १--४--० |
| रा. सा. | राळे दादासाहेब | नगर | ५--०--० |
| श्री० | रेगे जी. के. | इंदूर | १--०--० |
| ,, | ,, रघुनाथ दत्तात्रय | कुडाळ | १--०--० |
| ,, | लोटलीकर कृष्णाजी नारायण | मुंबई | १--४--० |
| | | | रु. २६८-१२-० |

| | | | रु. आ. पै |
|---|---|---|---|
| | | मागील पानावरून रु. | २६८–१२–० |
| श्री. | वगळ रामकृष्ण नाना | मुंबई | १–०–० |
| सौ० | वगळ कै. सीताबाई रामकृष्ण | ,, | १–०–० |
| श्री० | वखारकर खंडेराव दिनानाथ | ,, | १–०–० |
| ,, | वझे आर. बी. | इंदूर | ३–०–० |
| ,, | वरळीकर बाबूराव जयराम | दादर | ०–८–३ |
| सौ० | वराडकर इंदूबाई | कराची | ०–८–३ |
| ,, | ,, राधाबाई | ,, | ०–५–३ |
| श्री० | वर्तक लक्ष्मण गोविंद | मुंबई | १–४–० |
| सौ० | वालावलकर सीताबाई राजाराम | वांद्रे | १–०–० |
| श्री० | वाक्कर जयराम पांडुरंग | कराची | ०–८–३ |
| श्री० | विजयकर गंगाबाई मा. | मुंबई | १–०–० |
| श्री० | विनायक खंडेराव माधवराव | ,, | ३–०–० |
| श्री० | गिरधर विनायक शंकर | अंधेरी | १–०–० |
| सौ० | वेलिणकर यशोदाबाई | खार | १–४–० |
| श्री० | वैद्य दत्तात्रय गणेश | सांताक्रुझ | १–४–० |
| ,, | वैद्य बळवंत आप्पाजी | अंधेरी | १–०–० |
| ,, | ,, विनायक आप्पाजी | ,, | १–४–० |
| ,, | ,, बाळकृष्ण वामन | वांद्रे | २–०–० |
| ,, | भाऊ आचार्जी | पालघर | २–८–० |
| ,, | व्यवहारकर आनंदराव वामनराव | मुंबई | १–४–० |
| सौ० | सरस्वतीबाई ग. | ,, | १–०–० |
| श्री० | शिरसाट शुंभराव पुंडलीक | ,, | १–०–० |
| ,, | शिरोडकर सावळाराम आत्माराम | कुर्ले | १–८–० |
| ,, | वसंतकुमार वासुदेव | ,, | १–४–० |
| ,, | शिरोडकर गजानन शांताराम | दादर | ०–४–३ |
| ,, | ,, आनंदराव ,, | ,, | ०–४–३ |
| | | | रु. २९९–१०–६ |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | | मागील पानावरून रु. | २९९-१०-६ |
| श्री. | शृंगारपुरे व्ही. बी. | पोलघर | २--८--० |
| ,, | शेलार सुंदरराव बाळाराम | चेऊल | १--४--० |
| ,, | ,, शंकरराव केरोबा | ,, | ०--४--० |
| ,, | श्रोत्री दामोदर सदाशिव | ठाणे | १--५--० |
| ,, | हरि गोपाळ सकपाळ | वांद्रे | १--४--० |
| ,, | सबनीस दत्तात्रय मोरेश्वर | पार्ले | २--८--० |
| ,, | साईभक्त | इन्दूर | ५--०--० |
| ,, | सातवरे चिंतामण रामनाथ | वांद्रे | १--४--० |
| ,, | सामंत वासुदेव दत्तात्रय | उतलसर | १--०--० |
| ,, | सांवारे दाजी विठ्ठल | पार्ले | ५--०--० |
| डॉ० | सावे केशरीनाथ वासुदेव | मुंबई | १०--०--० |
| श्री० | सावे मोरेश्वर नारायण | ,, | ३--०--० |
| ,, | सोनटक्के लक्ष्मण बाळकृष्ण | ,, | ०--४--० |
| ,, | मोहनलाल शंकरलाल | अहमदाबाद | १--४--० |
| ,, | सौदागर मेघश्याम विठ्ठल | वेंगुर्ले | १--४--० |
| ,, | सुवार नारायण पुंडलीक | वांद्रे | ५--०--० |
| ,, | हेजीब सीताबाई | कराची | ०--८--३ |
| कु० | हिराबाई | मुंबई | ०--८--० |
| | | एकंदर रुपये | ३४२-११-९ |

## श्रीदासगणूमहाराज यांच्या पत्रांतील उतारा.

श्रीसाईमहाराजांचे समाधींतून पाणी अद्याप निघतच आहे. येथील साईमहाराजांच्या समाधीस आठ दिवस स्नान घालणेंच बंद करून पाहिले, पण पाणी थांबले नाहीं ।। आतां ४--५ दिवसांनीं येथून जाणार आहे.

क. लो. हे. आ.

१८—५—३५ }
शिरडी

दासगणू

श्रीसाईबाबा

# मार्च सन १९३५ चें शिर्डीवृत्त

मार्च सन १९३५ या महिन्यांत शिर्डी येथें श्रीसाईसमाधिदर्शनाकरितां ५० श्रीसाईभक्त व संतप्रेमी मंडळी मुंबई, अहमदनगर, बेलापूर, संगमनेर, मेहराबाद चांदोरी, चाळीसगांव, रावळगांव, धुळें, चांदवड, जामगीर, धनतोडी, पंढरपूर, सातारा या ठिकाणांहून आली होती. त्यापैकीं कांहीं जणांनीं श्रींस अभिषेक व नैवेद्य केले. ता.३–३–३५ रोजीं महाशिवरात्रीस व ता.२५–३–३५ रोजीं रंगपंचमीस, पालखीची व रथाची मिरवणूकी अनुक्रमें झाली. सोलापूर येथील रा. रा. परशराम विष्णु गोखले यांनीं श्रींपुढें ता. १४–३–३५ रोजीं किर्तन केलें. सरकारी अधिकारी मंडळी रा. रा. फडके मामलतदारसाहेब व प्रांतसाहेब रा. रा. दहलजीया श्रींच्या दर्शनास आली होती. ह. भ. प. दासगणूमहाराज यांचे एक शिष्य रा. रा. किसनराव पार्डीकर हे पंढरपूरहून ता. १९–३–३५ रोजीं श्रींच्या दर्शनास येऊन ते ६ दिवस राहून परत त्यांच्या गांवीं गेले. दरम्यान श्रींपुढें भजन, गायन व कीर्तन करीत होते. रा. रा. गोविंद विष्णु क्षीरसागर, वलार्क मामलतदार चांदवड यांनीं श्रींपुढें गाण्याची हजेरी दिली.

२ राहतें येथील शेट नवलशेटजी यांना कुष्टरोग झाला होता, त्यावर ओव्हरसिअर रा. रा. आर. बी. आठवले यांनीं औषध दिल्यावरून श्रींस नवस केला होता. त्याप्रमाणें शेटजींस गुण पडल्यामुळें त्यांनीं लेंडीबागेंत चारपांचशें माणसांस गुळ, शिरा, भात व वरण यांचें जेवण केलें.

## ३ जिनसा, देणगी वगैरे

१ रा. रा. विठ्ठल बाळाजी कुंभकर्ण, अहमदनगर, सुती २ वार रेशमी कापड.

२ श्री. सोनाबाई गुजराती, कान्होबाची मढी, मद्राचा गलफ फित लावलेला, मध्यें हिरवा व बाजूस पिवळा.

३ रा. रा. त्रिंबक हरि नावडे, धुळें, चांदीची बेडी भार ३॥ तोळे.

४ रा. रा. मुसा बावाजी टीनवाला, पंढरपूर, कायमफंडास रुपया १ (एक)

५ रा. रा. नानु भटजी पुजारी, शिर्डी, १ सुवासिक तेलाची बाटली.

## ४ चमत्कार

श्रींच्या समाधीच्या पश्चिम बाजूकडून वरच्या बाजूनें ता. २१—३—३५ पासून रोज संध्येच्या पळीभर पाणी निघतें आहे. पुसून काढलें तरी तात्कालीच पुन्हा पाझर देतो. हा चमत्कार पाहण्याकरितां गांवांतील व आजूबाजूकडील मंडळी येत आहे. संस्थानचे एक विश्वस्त रा. रा. तात्या गणपत पाटील कोते, संस्थान कमिटीचे एक सभासद व बाबांचे जुने भक्त व शिष्य शामा ऊर्फ रा. रा. माधवराव बळवंत देशपांडे,

पी. डब्ल्यु. डी. चे ओव्हरसियर रा. रा. आर. डी. आठवले यांनी हा चमत्कार पाहिला. त्याबद्दलचा उलगडा त्यांना झाला नाही.

## ५ सभामंडप

सभामंडपाचें काम पाया भरून जोतेपर्यंत झालें आहे. त्यात जोडलेल्या स्वयंपाकघराच्या भिंतीचें काम सुरू असून तें एकदोन दिवसांनी पुरें होईल. दरवाजे, खिडक्या, लोखंडी खांब व बीम्स हें सामान मुंबईहून पाठवावें लागले. श्रीरामनवमी-उत्सवापूर्वी खांब उभारून व बीम्स घालून काम होईल. बाकीचें राहिलेलें काम उत्सवा-नंतर सोईप्रमाणें करण्यांत येईल. सभामंडपामुळें समाधिमंदिरास जास्त शोभा येईल. पी. डब्ल्यु. इरिगेशनचे ओव्हरसिअर रा. रा. आर. डी. आठवले, हे कामावर देखरेख ठेवीतात व ओव्हरसिअर रा. रा. रामराव व पी. डब्ल्यु. डी. सब डिव्हिजनल ऑफिसर रा. रा. गोखले हे काम पाहण्यास आले होते.

## ६ अनुभव

सभामंडपाचे कॉन्ट्रॅक्टर र. रा. एस. पी. गोरे, इंजिनिअर यांचे मॅनेजर रा. रा. सहस्रबुद्धे यांनी त्यांचा अनुभव सांगितला तो येणेंप्रमाणें.—

ता. २५।३।३५रोजी रंगपंचमीच्या दिवशी रात्रीं श्रीमंदिराच्या गच्चीवर म्हाताऱ्या माणसाच्या काठी टेकण्यासारखा मोठ्यानें आवाज ऐकूं येत होता. चौकेर फिरून पाहिलें तरी सारखा आवाज येत होता।

७ श्रीसमाधिमंदीर व श्रीद्वारकामाई मशिदीतील पेट्यांत माघ शके १८५६ या मासांत एकंदर रक्कम रु. ५५-६-० जमलेली मिळाली व ती अनुक्रमें रु. ४५-१५-६ व रु. ९-६-६ होती.

## ८ गैरसमज

बऱ्याच भक्तांचा पौष महिन्याच्या श्रीसाईलीलेमधील जानेवारी १९३५ च्या शिर्डीवृत्तांतातील ह. भ. प. दासगणूमहाराज यांच्यासंबंधाच्या मजकुरावरील गैरसमज झालेला दिसतो. त्यांना कांहीं अडचण होती, म्हणून त्यांनीं श्रीरामनवमीस उत्सवा येण्यास जमणार नाहीं म्हणून शिर्डी संस्थानच्या पोटकमिटीस कळविलें. परंतु होत होईतोंपर्यंत ते श्रीरामनवमीउत्सवास येतील असें त्यांनीं कळविलें होतें. ते आता नेहमी-प्रमाणें उत्सव करण्यास शिर्डीस येणार आहेत हें त्यांच्या उत्सवाच्या आमंत्रणपत्रिके-वरून दिसून येईल.

## ९ सॅनिटेरियम

सॅनिटेरियमच्या योजनेच्या कामास अजून सुरवात झाली नाहीं. कै. दीक्षित यांच्या जागेंत पांच लहान घरें तीन ओळ्यांनी चांगली बसतात. मध्यभागी पाण्याची विहि

खादावयाची आहे. तीन खोल्यांच्या घरांत पुढें-पाठीमागें ओटा, एक खोली, एक दिवाणखाना व लहान स्वयंपाकखोली ह्या सोई करावाच्या आहेत. ह्यास खर्च सुमारें रु. २५०० पर्यंत येईल. दोन खोल्यांच्या घरास रु. १५०० खर्च येइल हें मागे लिहिलें आहे. जर हीं घरें पक्की चुन्याचीं न बांधतां मातीचीं बांधली तर खर्च कमी येईल. पण त्यामुळें दुरुस्तीकरितां वारंवार होणारा खर्च करावा लागेल.

## १० संस्थानसमाचार

संस्थानच्या पोटकमिटीची सभा सान्ताक्रुझ येथें ता. २४।४।३५ रोजी संध्याकाळीं रावबहादुर गोरक्षकर वि. प्रधान यांच्या बंगल्यांत भरली होती. त्या वेळीं नेहमींचीं मामुली कामें करण्यांत आलीं. त्याशिवाय श्रीसाईबाबांच्या भक्तांचे अनुभव एकत्र करून त्यांचीं पुस्तकें बांधून विक्रीकरितां तयार करावींत असा विचार झाला व श्रीसाईभक्तांच्या सोईसाठीं कमिटीनें श्रींचे निरनिराळ्या बैठकीचे फोटो विक्रीकरितां तयार ठेवावे असा बद्दलचाही विचार झाला.

## ११ श्रीसाईसच्चरित

श्रीसाईसच्चरिताच्या सुमारें ९० प्रती जुळवून त्या बांधण्यास दिल्या आहेत. ज्या भक्तांनीं त्याकरितां नांवें नोंदलीं आहेत, त्यांना पहिल्यानें प्रती देण्यांत येतील. प्रती जुळविण्याचें काम रा. रा. रा. आ. तर्खड यांच्या देखरेखीखालीं, रा. रा. र. भा. पुरंदरे व रा. रा. हा. ना. गोरक्षकर या दोघांजणांनीं फार मेहनत घेऊन केलें.

शिर्डी येथें हवापाणी उत्तम आहे.

साईभुवन,
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट,
मुंबई, ता. ३ एप्रिल १९३५

सुंदरराव दि. नवलकर,
आ. चिटणीस,
शिर्डी-संस्थानकमिटी

श्रीसाईबाबांचा

# एप्रिल १९३५ चें शिर्डीवृत्त

एप्रिल महिन्यांत १२२ संतप्रेमी बांधव श्रीसाईबाबासमाधिदर्शनाकरितां मुंबई, वांद्रे, सान्ताक्रुझ, अंधेरी, आनोळा, ठाणें, पुणें, खडकी, मिरज, नाशिक, सिन्नर, भुसावळ, धुळें, येवलें, अहमदनगर, चितळी, खरवंडी, देवीचें कडेगांव, येलादूर, पारनेर, औरंगाबाद, खामगांव, गुळगंज, राजुरी, खळें या ठिकाणाहून आले होते. यांपैकीं कांहींजणांनीं श्रींस अभिषेक व नैवेद्य केले. श्रीरामनवमीउत्सवांत आजूबाजूच्या खेड्यांतील चार हजार मंडळी दर्शनास येऊन गेली. गुरुवार ता. ४।४।३५ रोजीं श्रींच्या रथाची गुढीपाडव्याच्या मुहूर्ताची मिरवणूक काढली होती.ह्या मिरवणुकींत सुमारें तीनशें मंडळी होती.

अंधेरी येथील रा.रा. विनायक अप्पाजी वैद्य यांनीं ता. १९।४।३५ रोजीं श्रीचरणापुढें मुलाचें जावळ काढलें. त्याचप्रमाणें पुणे येथील रा. रा. त्रिंबक दामोदर रासने यांनीं श्रींपुढें मुलाचें जावळ व नामविधि केला व ता. २८।४।३५ रोजीं रविशंकर बाळकृष्ण रासने यांनीं श्रींपुढें आपल्या मुलाची गुळाची तुळा केली व तो प्रसाद म्हणून सर्वांना वांटला व रा. रा. रा. लक्ष्मीशंकर बाळकृष्ण रासने यांनीं श्रींपुढें ३० गलासांनें मेणबत्तीचे दिवे लावले.

## २ श्रींस देणगी, जिनसा वगैरे अर्पण केल्या त्या

१ रा. रा. गुलाबचंद शेट मारवाडी अहमदनगर, १ चांदीची छत्री लहान, भार २॥ तोळे व सुती हिरवा रंगाचा गलफ १॥ वार.

२ ह. भ. प. दासगणूमहाराज, शिर्डी, १ वायलचा केशरी रंगाचा गलफ व १ सुती उपरणें.

३ रा. रा. हरि सावळाराम रासने, अहमदनगर, १ केशरी रंगाचा व हिरवी फीत लावलेला रेशमी सॅटीनचा गलेफ.

४ रा. रा. अनंत व्ही. चिने वकील, ठाणे, १ पांढरे रेशीमकांठी उपरणें.

५ सौ. अंजनीबाई बनकर, शिर्डी, १ सुती उपरणें.

६ श्रीमती पिरोजबाई रामराव कोठारे, मुंबई: १ स्मफिरी रंगाचा रेशमी जरीचा शेला.

७ चि. श्रीनाथ सुंदरराव नवलकर, मुंबई १ कागदावर स्वतः विणलेली श्रीसाईबाबांची तसबीर.

८ सौ. पार्वतीबाई शंकर सोनार, भवाणी वाडगांव, १ चांदीची तबकडी, भार १ तोळा.

९ रा. रा. हेमराज हिंदुमल मारवाडी, वड्वाडी, १ डाळींबी रंगाची रेशमी जर वेलबुटीचा चादर.

१० श्रीयुक्ता मंजुळाबाई दगडु कोल्हाटीण, बेलापूर, १ तीन ग्लोबाचा इलेक्ट्रिक झुंबर.

११ श्रीमती लक्षुबाई जैरामजी रावते, अंधेरी, १ जरमन निरांजन.

१२ सौ. सुभद्राबाई पांडुरंगजी, अंधेरी, १ पितळी समई वजन पक्के ३ शेर व ५ वार केशरी रंगाचें वायल कापड.

१३ रा. रा. यशवंत नाना शिंदे, अंधेरी, १ कापडाचा हार.

१४ रा. रा. रामकृष्ण गंगाराम चौधरी, मुखेड, १ लहान पितळी ताट.

१५ श्रीमती काशीबाई कानिटकर, अहमदनगर, १ चांदीचा पाळणा, भार तोळे.

१६ श्रीमती यमुनाबाई गजानन कोठारे, सान्ताक्रुझ, १ लहान पितळी पाळणा.

१७ रा. रा. विनायक आप्पाजी वैद्य, अंधेरी,१ केशरी रंगाचा रेशमी पितांबर ९ हात, १ मद्याची बाटली, दोन आणे भार अत्तर व लेंडी बागेकरितां रु. ०-६-३.

१८ रा.रा. गोपाळ भास्कर दातार वकील,ठाणे, १ उदबत्ती पुडा, १ चंदनाचें खोड.

१९ रा. रा. सावळाराम आत्माराम शिरोडकर, कुर्ला, १ कापुरवड्यांची पेटी पाव रतल, ३२ पुडे, १ उदबत्तीपुडा.

२० रा.रा. श्रीधर नारायण, खारकर, ठाणें, ऊद १ शेर, चंदन भुका अर्धा शेर, २ उदबत्ती पुडे, १ कापुरवड्यांची पेटी पाउण रतल, ४८ पुडे.

२१ रा. रा. लक्ष्मीशंकर बाळकृष्ण रासने, पुणे, १ नागपुरी रेशमी करवतीकाठी उपरणें, व हांड्यांत लावण्याचीं ग्लासें नग ३०.

२२ रा. रा. दामोदर सावळाराम रासने, अहमदनगर, २ तांदुळाचीं पोतीं.

२३ रा.रा. बाळाजी गोविंद रासने, अहमदनगर, १ तांदुळाचें पोतें.

२४ रा. रा. विठ्ठल बाळाजी कुंभकर्ण, अहमदनगर, सुती भगवें कापड २॥ वार

## ३ श्रींच्या समाधींतून पाणी पाझरतें

श्रींच्या समाधीच्या वरच्या बाजूनें आज दोन महिने झाले, तरी थोडें थोडें पाणी पाझरतें. तें पाणी पुसून काढल्यास पुन्हा त्यांतून पाणी निघतें. हा काय चमत्कार आहे, त्याबद्दल तपास चालला आहे. समाधीच्या भोवतालीं समाधिमंदिराच्या दिवाणखान्याच्या सपाटीपासून सुमारें तीन फूट उंचीचा चबुतरा आहे. त्याच्यावरच्या सपाटीपासून श्रींच्या समाधींतून हें पाणी पाझरतें. श्रींच्या समाधीवर रोज निरनिराळें कपडे घालण्यांत येतात. त्या कापडांची घडी करितां त एका बाजूस ओले असतात, असें दिसून आलें. तर त्याचें कारण पाहतां असें दिसून आलें कीं, श्रींच्या समाधीच्या त्या बाजूनें पाणी पाझरतें.

म्हणून ते कपडे त्या जागेवर ओले असतात. अशा रीतीनें श्रींच्या समाधींतून पाणी पाझरतें हें कळून आलें.

## श्रीसाईबाबांचा श्रीरामनवमीउत्सव शके १८५७

सालाबादप्रमाणें दासगणूमहाराज उत्सव साजरा करण्याकरितां नांदेडहून निघून शिर्डीस ता. ७ एप्रिल रोजीं त्यांच्या नांदेडच्या मंडळीसह आले. उत्सवास गुरुवार चैत्र शु. ८ स ( ता. ११-४-३५ ) सुरुवात झाली. त्या दिवशीं दासगणूमहाराज यांनीं कीर्तन केलें. रात्रीं चावडी व पालखीची मिरवणूक झाली. शुक्रवार सकाळीं सुमारें दोनशे शिर्डी गावांतील मंडळी गोदावरी गंगेच्या कावडी भरून घेऊन शिर्डीच्या ओढ्याजवळ येऊन बसली होती. तेथून सकाळीं ८ वाजतां कावडीची मिरवणूक वाजतगाजत गांवांत आणून समाधिमंदिरास व श्रीद्वारकामाईस प्रदक्षिणा करून समाधिमंदिरास आली. मिरवणुकी-बरोबर रा. रा. श्रीनाथ सुंदरराव नवलकर यांनीं मागावर काढलेली श्रींची तसवीर होती. श्रीसमाधिमंदिराच्या द्वारावर श्रीयुत बाळासाहेब देव, एक संस्थानचे विश्वस्त यांनीं गोदावरीच्या कावडीची पूजा केली. तसेंच श्रींच्या तसबिरीची गोदोदकानें पूजा केली. नंतर तसबीर श्री समाधिमंदिरांत ठेवण्यांत आली व प्रत्येक जणानें कावडींतील गोदोदकानें श्रींच्या समाधीस स्नान घातलें. ही कावडीची मिरवणूक व गोदोदकाच्या स्नानाचा समारंभ प्रेक्षणीय होते. या समारंभाचें श्रेय दासगणूमहाराज यांस आहे. त्यांनीं हा समारंभ गेल्या वर्षापासून सुरू केला आहे. उत्सवास नेहमींपेक्षां बाहेरगांवची मंडळी कमी आली होती व यंदा यात्राही फार आली नव्हती. याचे कारण लोकांची सांपत्तिक स्थिति असावी. शुक्रवारीं शु. ९ पहाटेस काकडआरति झाल्यानंतर श्रींस भक्तांचे अभिषेक सकाळीं आठ वाजेपर्यंत चालले होते. नंतर गोदोदकाच्या स्नानास सुरवात झाली.

दोनप्रहरीं श्रीरामजन्माचें कीर्तन दासगणूमहाराज यांनीं केलें. नंतर श्रींची आरति होऊन श्रींच्या प्रसादास (भोजनास )तीन वाजले. संध्याकाळीं निशाणाची मिरवणूक झाली. रात्रीं रथाची मिरवणूक झाली. रथांत श्रींच्या जुन्या तसबिरीपुढें नवीन कापडाची तसबीर ठेवण्यांत आली. मिरवणुकीनंतर शोभेचें दारुकाम झालें. तें रात्रीं एक वाजतां संपलें.

शनिवार शु. १० स ही श्रींस भक्तांचे अभिषेक करण्यांत आले. सकाळीं कुस्त्या झाल्या. यंदा कुस्त्यांकरितां फार गडी आले नव्हते. त्याचें कारण असें समजतें कीं, कुस्त्यांत बक्षिस वांटण्याकरितां पुरेशी रक्कम जमत नाहीं. संध्याकाळच्या सुमारास दासगणू-महाराज यांनीं कीर्तन केलें. आख्यान श्री शेख महमद महाराज, श्रीगोंदे यांचें लावलें होतें. रविवार चैत्र शु. ११ ता. १४।४।३५ रोजीं सकाळीं श्रींस अभिषेक केला व तिसऱ्या प्रहरीं रा. रा. बाळासाहेब देव यांचें कार्यक्रमाप्रमाणें कीर्तन झालें. आख्यान त्यांनीं स्वतः रचलेलें श्रीसाई आख्यान लावलें होतें. त्यांना साथ त्यांचे पुतणे व दासगणूमहाराज

यांचे शिष्य विठ्ठलराव यांनीं दिलें. कीर्तन पैशाच्या अडचणीमुळें अपुरें राहिलेल्या नव्या सभामंडपाच्या जागेंत झालें.

सोमवार चैत्र शु० १२ ता. १५।४।३५ सकाळीं रा. रा. काळ्यांचें कीर्तन झालें व प्रसाद होऊन उत्सवाचा समारंभ समाप्त झाला. उत्सवाबद्दलचा अहवाल दासगणूमहाराज स्वतंत्र रीतीनें नेहमींप्रमाणें प्रसिद्ध करितील.

उत्सवात नेहमीप्रमाणें पुण्याचे रा. रा. दत्तात्रय दामोदर रासने यांनीं आपल्या बरोबर भजनरत्न रा. रा. बा. गो. पंडित व इतर मंडळी आणिली होती. त्या सर्वांनीं उत्सवांत श्रीच्यापुढें रोज सकाळीं व रात्रीं गायन करून समारंभास शोभा आणून पाहुणे मंडळींचें मनरंजन केलें.

उत्सवांत भोजन वगैरे वेळेवर होत व स्वयंपाक स्वच्छ असून चांगला होता.

## सभामंडप

सभामंडपाचें काम तूर्त बंद ठेवण्यांत आलें आहे. कारण नगरचे रा. रा. दामोदर सावळाराम रासने व दासगणूमहाराज यांनीं सभामंडपाचें काम सुरू केलें म्हणजे त्या कामीं रकमा आणून देण्याचीं पूर्ण आश्वासने दिलीं होतीं, म्हणून त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवून संस्थानकमिटीनें सभामंडपाच्या कामास सुरवात केली. परंतु आज काम सुरू होऊन तीन महिने होऊन गेले, तरी त्यांच्या आश्वासनाप्रमाणें त्यांनीं अद्याप रकमा आणून दिल्या नाहींत व यास्तव पैशाच्या अभावीं काम बंद ठेवावें लागलें आहे.

सभामंडपाच्या कामापैकीं स्वयंपाकघराच्या भिंती, पहिल्या मजल्याचे लोखंडी खांब व त्यावरील बिम्स घालून तयार ठेवले आहेत. आतां तळमजल्यावरील बाजूच्या भिंतीचें काम पहिल्या मजल्याची तक्तपोशी व भिंत व त्यावरील गच्चीची तक्तपोशी एवढीं कामें राहून करावयाचीं आहेत. अंदाजाप्रमाणें सर्व काम पुरें होण्यास रु. १५००० ची रक्कम पाहिजे संस्थान फक्त तळमजल्याचाच सभामंडप करण्याच्या बेतात होतें. परंतु रा. रा. रासनें यांनीं मजल्याचा सभामंडप बांधावा व त्याकरितां रकमा आणून देतों म्हणून आश्वासनें दिलीं, त्यावरून संस्थाननें मजल्याचा सभामंडप बांधण्याचा विचार केला व त्या प्रमाणें कामासही सुरवात केली. कामास सुरवात होऊन दोनतीन महिने झाले, तरी रकमा आल्या नाहींत व त्यामुळें तूर्त काम बंद पडलें आहे, सभामंडपाचे कॉन्ट्रॅक्टर रा. रा. एस. पी. गोरे यांनीं श्रीरामनवमी उत्सवाकरितां स्वयंपाकघर बहुतेक तयार करून दिलें व सभामंडपाचे लोखंडी खांब वगैरे उभारण्यास मदत केली, त्यामुळें दासगणूमहाराजांस नेहमींप्रमाणें निराळें तात्पुरतें स्वयंपाकघर करण्याचें व कीर्तनाकरितां मांडव उभारण्याचें कारण पडलें नाहीं.

# श्रीसद्गुरु साईबाबा

सप्रेम सा. न. वि. वि. सालाबादप्रमाणें श्रीगुरुपौर्णिमेचा उत्सव मिति आषाढ शुद्ध पौर्णिमा शके १८५७ मंगळवार ता. १६ जुलई १९३५ रोजीं श्रीक्षेत्र शिर्डी येथें श्रीसाईबाबा समाधि-मंदिरांत होणार आहे. तरी आपण सदर प्रसंगीं मित्रमंडळीसह अवश्य येण्याची कृपा करावी, अशी विनंती आहे.

## उत्सवाचा कार्यक्रम

**सोमवार**—आषाढ शु. १४, ता. १५ जुलई १९३५.
सकाळीं-रोजचा कार्यक्रम, दोन प्रहरीं-आरती. नंतर-भोजन, चक्रीभजन. रोजचा कार्यक्रम रात्रौ-भजन व रथाची मिरवणूक.

**मंगळवार**—आषाढ शु० पौर्णिमा, ता. १६ जुलई १९३५.
सकाळीं-श्रींच्या समाधीस रुद्राभिषेक, श्रींची पूजा. दोन प्रहरीं-आरति व नंतर प्रसाद. ३ वाजतां शिर्डी संस्थान कमिटीची सभा. ५ वाजतां शिर्डी संस्थानच्या भक्तमंडळाची शके १८५६ ची १४ वी वार्षिक सभा.

**बुधवार**—आषाढ व० ता. १ १७ जुलई १९३५
सकाळीं-श्रींची पूजा. दोनप्रहरीं-आरति. नंतर-भंडारा. रात्रौ पालखीची मिरवणूक व गारुड

**गुरुवार**—आषाढ व० २ ता. १८ व जुलै १९३५
सकाळीं-काला, तीर्थप्रसाद; रात्रौ चावडी व भजन

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस.
रा. आ. तर्खड, ऑ. खजिनदार.
बापुराव रा. बोरावके,
ऑ. दुय्यम चिटणीस.
रघुवीर भा. पुरंदरे,
ऑ. दु. खजिनदार.
कार्यवाह शिर्डीसंस्थान कमिटी.

मोरेश्वर विश्वनाथ प्रधान.
तात्याजी गणपत पाटील कोते.
बाळकृष्ण विश्वनाथ देव.
सखाराम बळवंत धुमाळ.
वासुदेव नारायण चांदोरकर.
श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानचे
विश्वस्त ( ट्रस्टीज )

जेष्ठ शु॥ १४ शके १८५७
शिर्डी, ता. १५ जून १९३५

सेवेशीं साईदास,
केशव गोपाळ बुटी

---

टीपः—वरील कार्यक्रमामध्यें जरूरीप्रमाणें फेरफार केला जाईल.

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याच्या अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधी पत्रव्यवहार आमच्याकडे करावा.

४ लेखासंबंधी पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी

वार्षिक वर्गणी टपालखर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बाळबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाच्या दोन्हीं बाजूंस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि व्हावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती अगर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमच्याकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं देत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक, **श्रीसाईलीला**

दक्षिणा प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी [illegible], [illegible] विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मास - [illegible] दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणूमहार. [illegible] नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चाफेकर M. A., LL. B. ह्यांनी प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

**श्री पासष्टी–भावार्थ–दीपिका**

हा नरेंद्र बुक डेपो, दादर, मुंबई येथें मिळेल.

कापडी प्रत १० आणे.                    साधी प्रत ८ आणे.

---

सर्व प्रकारचे मेंदूच्या विकारांवर जागरण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध राहावें.

**बाळबाळंतिणीकरितां औषधें**

बाळंतकाढा नं. १—पहिल्या दहा दिवसांचा ॥१०; बाळंतकाढा नं. २ दहा दिवसानंतर ॥१४; बाळकडू:—मूल जन्मल्यापासून देण्याद योग्य ॥८; कुमारीआसव लहान मुलांकरितां ॥१२.

सतत २५ वर्षे लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १॥१० ) **द्राक्षासव** ( अर्धा रत्तल ॥१४.
दीड रत्तल २॥४                          ट. ख. वें. नि.

शिवाय आमच्या कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांच्या माहितीचा मोठा कॅटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण–पत्रिका" ही सात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स.** आर्यौषधी कारखाना, चेंबूर, जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ X २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, मुंबई नं० २

पुणें:—श्री साईनाथ आणि कंपनी


हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें रामचंद्र काशीनाथ तरणीस यांनी छापून रा. आ. तर्खड यांनी ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें येथें प्रसिद्ध केलें.